सोमवार
०२.०२.२०२६
किंमत २ रूपये
वर्ष २९ वे अंक ३५१ पाने ४
R.N.I.No.MAHMAR./2001/10338
www.pritisangam.com
पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026

# प्रीतिसंगम




# टॅक्स स्लॅब 'जैसे थे'

## सर्वसामान्य नाखूश

नवी दिल्ली/वृत्तसंस्थाः-

रविवारी ०१ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राष्ट्रीय अर्थसंकल्प - २०२६ जाहीर केला.अर्थसंकल्प जाहीर केल्यानंतर शेअर बाजार गोंधळ उडाला. शेअर बाजार २३०० पेक्षा जास्त अंकांनी घसरला आहे.अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाचा शेअर बाजारावर नकारात्मक परिणाम झाला आहे.तसेच सर्वसामान्यांसाठी या अर्थसंकल्पात ठोस अशी तरतूद नसल्याचे जाणवले.करांच्या पुनर्रचनेत कसलाही बदल नाही. तसेच करदात्यांना कुठलाही दिलासा देण्यात आलेला नाही.वाढती महागाई, बेरोजगारी दूर करण्यासाठी उपायायोजना केली नाही आणि शिक्षण,आरोग्यव्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसत नाही.अर्थसंकल्पात पर्यटन,मनोरंजनाला अधिक वाव दिल्याने केंद्र सरकारचे अत्यावश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे.या अर्थसंकल्पात सर्वसामान्य माणसाला दिलासा देण्यात आल्याचे दिसत नाही. यामुळे विरोधकांनी हा अर्थसंकल्प सुमार असल्याची टीका केली आहे.वित्तीय तूट जीडीपीच्या ४.५ टक्क्यापेक्षा कमी राहील.चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४ टक्के राहील.२०२६ -२७ मध्ये वित्तीय तूट जीडीपीच्या ४.३ टक्के राहण्याचा अंदाजे असल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे.

- १ एप्रिलपासून नवा आयकर कायदा लागू
- टॅक्स स्लॅब जैसे थे, प्राप्ती करात बदल नाही
- ३१ जुलैपर्यंत आयकर रिटर्न दाखल करता येणार
- अपघात विमा करमुक्त असेल
- सेमी कंडक्टरसाठी ४० हजार कोटी
- शुगर आणि कॅन्सरचे औषधोपचार स्वस्त
- मुंबई- पुणे आणि पुणे-हैदराबाद नवे रेल्वे कॉरिडॉर
- २० नवे जलमार्ग बनवणार
- बॅंकिंग क्षेत्राच्या विकासासाठी नवी समिती
- भारताला मेडिकल टुरीझम केंद्र बनवणार
- परदेशी नागरिक भारतीय शेअर खरेदी करणार
- चंदन, नारळ आणि काजू या पिकांना चालना देणार
- प्रत्येक जिल्ह्यात उच्चशिक्षणासाठी मुलींची वसतिगृह उभारणार
- २० प्रमुख पर्यटन स्थळांवर १० हजार पर्यटन मार्गदर्शक-टूर गाईड्स
- गेमिंग आणि कंटेंट क्षेत्रांच्या वाढीवर भर दिला जाईल
- २०३० पर्यंत २० लाख व्यावसायिक निर्माण केले जातील

## कॅन्सरसह १७ औषधांवर कस्टम ड्यूटी नाही
## ३ आयुर्वेदिक एम्स,७ हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर बनणार

२०२६ च्या अर्थसंकल्पात ५०० जलाशये आणि अमृत सरोवरांच्या एकात्मिक विकासावर भर देऊन शेती-संबंधित उपजीविकेला अधिक चालना दिली आहे.

देशात वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासाठी पाच प्रादेशिक वैद्यकीय केंद्रे उभारली जाणार आहेत.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रविवारी सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला, ज्यामध्ये रोजगार, कौशल्ये आणि सर्वसमावेशक विकासावर जोरदार भर देण्यात आला आहे. शेतकरी आणि विद्यार्थ्यांपासून ते सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजक, प्रवासी आणि तरुण व्यावसायिकांपर्यंत, २०२६ च्या अर्थसंकल्पात सामान्य माणसासाठी अनेक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदे देण्यात आले आहेत.

**शेतकरी आणि ग्रामीण मजुरांसाठी संधी**

२०२६ च्या अर्थसंकल्पात ५०० जलाशये आणि अमृत सरोवरांच्या एकात्मिक विकासावर भर देऊन शेती-संबंधित उपजीविकेला अधिक चालना दिली आहे, ज्यामुळे मत्स्यव्यवसाय आणि ग्रामीण उत्पन्न वाढेल. पशुसंवर्धन आणि लागवडीच्या पिकांना प्रोत्साहन दिले जात आहे, ज्यामुळे पारंपरिक शेतीपलीकडे अधिक चांगल्या पगाराच्या नोकऱ्या निर्माण होतील.

### काय स्वस्त..

- कपडे
- चामड्याच्या वस्तू व चामड्याची उत्पादने
- सिंथेटिक पादत्राणे
- १७ कर्करोग व मधुमेहावरील औषधे (शुल्कमुक्त)
- लिथियम-आयन बॅटरी
- मोबाइल बॅटरी
- सौर ऊर्जा प्रकल्पासाठी लागणारे सोलार ग्लास
- मिश्र वायू सीएनजी
- इलेक्ट्रिक वाहने (एत)
- मायक्रोवेव्ह ओव्हन
- विमान इंधन
- परदेश प्रवासाचा खर्च

### काय महाग..

काही क्षेत्रांमध्ये कस्टम ड्युटी वाढविण्यात आली असून त्यामुळे पुढील वस्तू महाग होण्याची शक्यता आहे -

- दारू
- भंगार
- सिगारेट
- खनिजे
- पीव्हीसी फ्लेक्स शीट

**नारळ, काजू, कोको आणि चंदन उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठी चालना**

नारळ प्रोत्साहन योजनेअंतर्गत जुन्या झाडांच्या जागी अधिक उत्पादन देणाऱ्या जातींची लागवड केली जाईल, ज्यामुळे १ कोटी शेतकऱ्यांसह सुमारे ३ कोटी लोकांना फायदा होईल. याचा उद्देश समर्पित मोहिमांचे २०३० पर्यंत काजू आणि कोकोला जागतिक स्तरावर प्रीमियम ब्रँड बनवणे, तसेच भारतातील चंदनाच्या परिसंस्थेला पुनरुज्जीवित करणे हा आहे.

नवीन भारत-विस्तार प्लॅटफॉर्म कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित, बहुभाषिक सल्ला सेवांचा वापर करून शेतकऱ्यांना उत्पादन वाढवण्यासाठी, जोखीम व्यवस्थापित करण्यासाठी आणि खर्च कमी करण्यासाठी मदत करेल, ज्यामुळे शेती अधिक फायदेशीर होईल आणि अंदाजे कामावरील अवलंबित्व कमी होईल.

### १ एप्रिल पासून नवा प्राप्तीकर कायदा लागू

१ एप्रिल पासून नवा प्राप्तीकर कायदा लागू केला जाणार आहे अशी घोषणा निर्मला सीतारमण यांनी केली आहे. तसंच प्राप्तीकर भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत दिली जाईल असंही सीतारमण यांनी म्हटलं आहे.

### कर प्रणाली

| | |
|---|---|
| ० ते ४ लाख रुपये उत्पन्न | कर नाही |
| ४ ते ८ लाख रुपये उत्पन्न | ५ टक्के कर |
| ८ ते १२ लाख रुपये उत्पन्न | १० टक्के कर |
| १६ ते २० लाख रुपये उत्पन्न | २० टक्के कर |
| २० ते २४ लाख किंवा त्यावरील उत्पन्न | ३० टक्के कर |

### करदात्यांसाठी केलेल्या महत्त्वाच्या घोषणा

१) आयटीआर अपडेटसाठी आता ३१ मार्चपर्यंत मुदत
२) १ एप्रिल २०२६ पासून देशात इन्कम टॅक्स अ‍ॅक्ट २०२५ अर्थात नवा प्राप्तीकर कायदा लागू होणार
३) मूळ रिटर्न भरण्यासाठी पगारदारांसाठीची मुदत ३१ जुलै असेल तर नॉन ऑडिट बिझनेस आणि ट्रस्ट यांच्यासाठी ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत असेल.
४) उत्पन्नाची माहिती न देणं, करचोरी करणं महागात पडणार आहे, करदात्याने जाणूनबुजून चुकीची माहिती दिली तर थकित कराच्या १०० टक्के दंड भरावा लागेल.
५) परदेशी टूर पॅकेजवर आकारला जाणारा टीसीएस ५ ते २० टक्के इतका होता, जो आता २ टक्के करण्यात आला आहे. परदेश प्रवास स्वस्त होणार असून पर्यटकांवर कराचा बोजा कमी होणार आहे.
६) नवीन कर नियमांमुळे कर प्रणाली सोपी होणार आहे. सामान्यांचा गोंधळ कमी होईल. १ एप्रिल पासून येणारे नवे नियम अशा पद्धतीने आणले आहेत की नागरिकांना कुठलीही अडचण न येता ते भरता येतील.


### क्लाऊड सर्व्हिस देणाऱ्या परदेशी कंपन्यांना २०४७ पर्यंत करमुक्ती

अपघात विम्यातली रक्कम ही करमुक्त असेल, ३१ ऑक्टोपर्यंत प्राप्तीकर परतावा भरण्याची मुदत. अघोषित संपत्तीवर दंड नाही तर कर भरण्याची तरतूद. क्लाऊड सेवा देणाऱ्या विदेशी कंपन्याना २०४७ पर्यंत करमुक्ती या घोषणाही निर्मला सीतारमण यांनी केल्या आहेत.

### महिला उद्योजिकांना बाजारपेठेची चालना

ग्रामीण महिलांच्या नेतृत्वाखालील उद्योगांसाठी 'शी-मार्ट्स' सुरू केले जातील, ज्यामुळे 'लखपती दीदी' उपक्रमाच्या यशावर आधारित, महिलांना सूक्ष्म-कर्जावरील अवलंबित्व सोडून पूर्ण विकसित व्यवसायाच्या मालकीकडे वाटचाल करण्यास मदत होईल.

### अर्थसंकल्पानंतर सेन्सेक्स १,५४६ तर निफ्टी ४९५ अंकांनी घसरला




अर्थसंकल्पीय भाषणानंतरः व्यवहारादरम्यान, सेन्सेक्स २३७० अंकांनी घसरून ७९८९९ या दिवसाच्या नीचांकी पातळीवर पोहोचला. निफ्टी देखील ७५० अंकांनी घसरून २४,५७१ च्या नीचांकी पातळीवर पोहोचला.

अर्थसंकल्पीय भाषणादरम्यानः सेन्सेक्स १६०० अंकांनी किंवा २ टक्क्यांनी घसरून ८०६०० वर पोहोचला. निफ्टी देखील सुमारे ५५० अंकांनी घसरून २४,८०० वर पोहोचला.अर्थसंकल्पीय भाषणापूर्वीः सकाळी ९:१५ वाजता, सेन्सेक्स १०० अंकांनी घसरून ८२,१५६ वर उघडला. निफ्टी देखील सुमारे ५० अंकांनी घसरून २५,२७५ वर उघडला.

### शेअर बायबॅकवर कर आकारणी

समभागाच्या पुनर्खरेदीवरील कराचे सुलभीकरण करण्यासाठी असा प्रस्ताव आहे की, पुनर्खरेदीवर मिळालेली रक्कम लाभांश उत्पन्न मानण्याऐवजी, 'भांडवली नफा' या शीर्षकाखाली करपात्र असेल. ही तरतूद १ एप्रिल, २०२६ पासून लागू असेल.

### देशाच्या जागतिक भूमिकेला चालना



देशात सुधारणांची एक प्रेरणा सुरू झाली आहे. केलेले बदल भारतातील धाडसी आणि प्रतिभावान तरुणांना अभिव्यक्तीने भरलेले एक मुक्त आकाश प्रदान करतात, अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी नवव्यांदा अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प सुधारणांना नवीन चालना देईल. कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता बळकट करण्याचा हा प्रयत्न आहे. सर्वात मोठी संपत्ती म्हणजे नागरिक, आम्ही त्यांच्यात गुंतवणूक केली आहे. हे अद्वितीय बजेट आहे, जे वित्तीय तूट कमी करण्यावर लक्ष केंद्रित करते. यासोबतच, अर्थसंकल्पात उच्च भांडवली खर्च आणि उच्च वाढ यांचा मेळ आहे. हे देशाच्या जागतिक भूमिकेला पुनरुज्जीवित करते.

### विकसित भारताकडे दमदार पाऊल



पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे १ लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील. तसेच शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ १ लाख कोटी असायची. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे.

### राज्यातील लहान शहरांच्या विकासाला वेग



एकीकडे लहान लहान शहरांच्या सर्वांगीण विकासाला चालना देतांना, पायाभूत सुविधा वाढवण्याच्या त्याचप्रमाणे सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्याच्या घोषणांमुळे देशाचे ग्रोथ इंजिन असलेल्या मुंबई आणि महाराष्ट्राला मोठे बळ मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नातील विकसित भारताच्या दिशेनं निर्धारपूर्वक पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प आहे. आत्मनिर्भर विकसित भारताकडे झेप घेणारा हा नववा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांचे हार्दिक अभिनंदन या शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

### आकड्यांचा खेळ आणि 'आभासी'



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पाला 'आकड्यांची भेळ आणि सामान्यांच्या स्वप्नांचा खेळ' असेच म्हणावे लागेल. कारण सरकारने या अर्थसंकल्पाला 'युवाशक्ती-ड्रिव्हन' म्हटले असले, तरी प्रत्यक्षात हा केवळ आकड्यांचा खेळ आणि 'आभासी' स्वप्नांचा डोलारा आहे अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी केली आहे.

### आत्मनिर्भरतेकडे नेणारा समतोल आणि भविष्यवेधी अर्थसंकल्प

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया या संकल्पनांचा सुसंगत व व्यवहार्य संगम साधणारा सकारात्मक अर्थसंकल्प आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, बायो-फार्मा, मेडिकल टुरिझम, कंटेंट क्रिएशन यांवर दिलेला भर भारताच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेला चालना देणारा आहे. वस्त्रोद्योग, हातमाग, ग्रामस्वराज्य, हॅण्डलूम व चंदन संरक्षण यांसारख्या योजनांतून संस्कृती आणि रोजगार यांचा समन्वय दिसतो. जलमार्ग, हाय-स्पीड रेल, शिप रिपेअर इकोसिस्टीम यामुळे पायाभूत सुविधा सशक्त होतील. युवक, दिव्यांग, मुलींचे शिक्षण व निवास यांना केंद्रस्थानी ठेवत समावेशक विकासाचा संदेश देणारा हा अर्थसंकल्प वित्तीय शिस्त राखून विकासाभिमुख दिशा दाखवतो. या अर्थसंकल्पात आयकाराच्या दरात बदल होणार नाही हे अपेक्षितच होते. या अर्थसंकल्पातील योजनांमुळे भारतीय जनतेची क्रयशक्ती वाढेल आणि उत्पादनाला चालना मिळेल म्हणून मी या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो.

**श्रीराम नानल**
**अर्थविश्लेषक**

## आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार कराड दौऱ्यावर



कराड/प्रतिनिधीः-

उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार सोमवारी तातडीने कराड दौऱ्यावर येणार आहेत. कराडच्या प्रीतिसंगमावर असलेली यशवंतराव चव्हाण यांची समाधी हे पवार कुटुंबाचे उर्जास्थळ आहे. त्याठिकाणी नतमस्तक होऊन राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या आपल्या नव्या इनिंगची सुरूवात करणार आहेत. त्या प्रथमच यशवंतरावांच्या स्मृतिस्थळी येत आहेत. सुनेत्रा ताईंच्या या दौऱ्यामुळे दिवंगत अजित पवार यांच्या प्रीतिसंगमावरील आठवणींना उजाळा मिळणार आहे.

विमान अपघातात अजित पवार यांचं अकाली निधन झाल्यानं महाराष्ट्र 'दादा' नेतृत्वाला मुकला आहे. अजितदादांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. परंतु, ज्या अजितदादांनी उपमुख्यमंत्री पदाची शान वाढवली, त्या पदावर पत्नी सुनेत्रा पवार यांना संधी देत अजितदादांच्या कर्तुत्वाचा सन्मान करण्यात आला. सुनेत्रा ताईंनी नुकतीच उपमुख्यमंत्री पदाची शपथ देखील घेतली आहे. प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात करण्यापूर्वी त्या कराड दौऱ्यावर येत आहेत.

यशवंत विचारांच्या मुशीत आणि शरद पवारांच्या तालमीत अजित दादांचे नेतृत्व घडले होते. त्यांनी सहा वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषविले. तसेच अर्थमंत्री म्हणून विधिमंडळात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे. झपाटून काम करणारा नेता अशी त्यांची ओळख होती. दरवर्षी २५ नोव्हेंबरला ते यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनी प्रीतिसंगमावर हमखास उपस्थित असायचे. उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर तिसऱ्याच दिवशी सुनेत्रा पवार प्रीतिसंमावर येत आहेत.

## दक्षिणेचा बुरूज ढासळल्यानंतर उत्तरेतही काँग्रेसला भगदाड

### निवासराव थोरात भाजपात;कमळाची पाळेमुळे घट्ट,विरोधकांच्या रणनीतीला यश

राजेंद्र मोहिते/कराडः-

२०२५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर कराडच्या राजकारणात सुरू झालेला परिवर्तनाचा प्रवाह आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत अधिक तीव्र होताना दिसत आहे. कराड दक्षिणनंतर आता कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातही काँग्रेसला मोठा धक्का बसला असून, कराड उत्तर काँग्रेसचे अध्यक्ष निवासराव थोरात यांनी भाजपात प्रवेश केल्याने काँग्रेसमधील गळतीचे चित्र अधिक ठळक झाले आहे.

विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक उलथापालथ

#### अंतिम निकाल जनतेच्याच हाती

ज्या जिल्हा परिषद गटातून निवासराव थोरात काँग्रेसच्या चिन्हावर निवडून आले, त्या मतदारसंघात विरोधकांना मदत करण्याची त्यांची भूमिका मतदारांना कितपत रुजते, हे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या निकालानंतर स्पष्ट होणार आहे. कराड नगरपालिका निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर झालेले पक्षप्रवेश प्रत्यक्ष मतदानात अपेक्षित लाभ देऊ शकले नाहीत, हे वास्तव आहे. त्यामुळे कराड उत्तरमधील सध्याच्या राजकीय घडामोडी मतदारांवर नेमका काय परिणाम घडवतात, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.



घडवत कराड दक्षिणेत भाजपचे डॉ. अतुल भोसले यांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा, तर कराड उत्तरेत भाजपचे मनोज घोरपडे यांनी माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांचा पराभव केला. या विजयानंतर भाजपने दोन्ही मतदारसंघांतील काँग्रेस-राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावण्याची रणनीती राबवली असून, त्याला यश येताना दिसत आहे.

मलकापूर नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कराड दक्षिण काँग्रेसचे अध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे यांनी आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भाजपात प्रवेश केला. अनेक दशकांपासून काँग्रेसच्या ताब्यात असलेली



सत्ता भाजपकडे हिसकावल्याची ही नांदी मानली गेली. यानंतर कराड, मलकापूर व दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक स्थानिक नेत्यांनी भाजपची वाट धरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

त्याच धर्तीवर आता कराड उत्तरमध्येही काँग्रेसला मोठा हादरा बसला आहे. सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत कारखान्याचे चेअरमन, माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या विरोधात स्वतंत्र पॅनेल उभा करणारे, कराड उत्तर काँग्रेसचे अध्यक्ष

माजी जिल्हा परिषद सदस्य निवासराव थोरात यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत भाजपात प्रवेश केला आहे. ऐन जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या रणधुमाळीत झालेल्या या पक्षांतरामुळे उत्तरेच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, काँग्रेसला हा सलग दुसरा मोठा धक्का मानला जात आहे.

एकंदरीत, कराड दक्षिण व कराड उत्तर या दोन्ही विधानसभा मतदारसंघांत भाजपच्या आमदारांनी विरोधकांचे



बालेकिल्ले भेदत त्यांच्या प्रमुख नेत्यांनाच आपल्या गोटात आणण्याची खेळी यशस्वी केल्याचे चित्र आहे. मात्र, या 'इनकमिंग' राजकारणाचे पडसाद सर्वच स्तरांवर सकारात्मक असतील का?, याबाबत शंका उपस्थित होत आहेत.

#### भाजपच्या गोटातही अस्वस्थता

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत भाजपने अनेक जुन्या, निष्ठावान पदाधिकारी व कार्यकर्त्यांना डावलून आयत्यावेळी पक्षात आलेल्यांना उमेदवारी दिल्याने पक्षांतर्गत नाराजीचा सूर उमटत आहे. या अन्यायकारक भूमिकेविरोधात काही स्वाभिमानी कार्यकर्त्यांनी वेगळी भूमिका घेतल्याने भाजपच्या डोकेदुखीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

# संपादकीय

## घोषणांचा अर्थसंकल्प

रविवारी ०१ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राष्ट्रीय अर्थसंकल्प - २०२६ जाहीर केला. अर्थसंकल्प जाहीर केल्यानंतर शेअर बाजार गोंधळ उडाला. शेअर बाजार २३०० पेक्षा जास्त अंकांनी घसरला आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाचा शेअर बाजारावर नकारात्मक परिणाम झाला आहे. तसेच सर्वसामान्यांसाठी या अर्थसंकल्पात ठोस अशी तरतूद नसल्याचे जाणवले. करांच्या पुनर्रचनेत कसलाही बदल नाही. तसेच करदात्यांना कुठलाही दिलासा देण्यात आलेला नाही. वाढती महागाई, बेरोजगारी दूर करण्यासाठी उपायायोजना केली नाही आणि शिक्षण, आरोग्यव्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. अर्थसंकल्पात पर्यटन, मनोरंजनाला अधिक वाव दिल्याने केंद्र सरकारचे अत्यावश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. या अर्थसंकल्पात सर्वसामान्य माणसाला दिलासा देण्यात आल्याचे दिसत नाही. यामुळे विरोधकांनी हा अर्थसंकल्प सुमार असल्याची टीका केली आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटले आहे की, वित्तीय तूट जीडीपीच्या ४.५ टक्क्यापेक्षा कमी राहील. चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट ४.४ टक्के राहील. २०२६ -२७ मध्ये वित्तीय तूट जीडीपीच्या ४.३ टक्के राहण्याचा अंदाजे असल्याचे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे. रोजगारनिर्मिती, करसुलभीकरण, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पर्यटन, शेती आणि तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणारा हा अर्थसंकल्प बरा आहे, परंतु उत्कृष्ट नाही, जो सर्वसामान्य माणसाला दिलासा देऊ शकेल. या अर्थसंकल्पात आयकर स्लॅबमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. ० ते ४ लाखांपर्यंत उत्पन्न करमुक्त, ४ ते ८ लाखांवर ५ टक्के, ८ ते १२ लाखांवर १० टक्के, १६ ते २० लाखांवर २० टक्के आणि २० लाखांवरील उत्पन्नावर ३० टक्के कर अशी रचना कायम ठेवण्यात आली आहे.

कर स्लॅबमध्ये बदल नसला तरी नवा आयकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होणार ही घोषणा महत्त्वाची आहे. आयकर कायदा २०२५ अंतर्गत करप्रणाली अधिक सोपी, स्पष्ट आणि डिजिटल होणार असल्याचा सरकारचा दावा आहे. करदात्यांचा गोंधळ कमी करणे आणि अनुपालन सुलभ करणे, हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. स्वप्ने दाखवणे म्हणजे वास्तव नव्हे, त्याचप्रमाणे दावा करणे म्हणजे प्रत्यक्ष विकास नसतो, हे केंद्र सरकारने ध्यानात ठेवले पाहिजे. या अर्थसंकल्पातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा म्हणजे परदेशी टूर पॅकेजेसवरील टीसीएस दर थेट २ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय होय. आतापर्यंत हा दर ५ ते २० टक्क्यांपर्यंत होता. त्यामुळे परदेश प्रवास करणाऱ्या मध्यमवर्गीयांवर मोठा आर्थिक भार पडत होता. केंद्र सरकारच्या या घोषानेमुळे देशातील नवश्रीमंतांना दिलासा मिळाला असेल; पण सर्वसामान्य माणसाचे हीत सरकारने वार्षिक अर्थसंकल्पात लक्षात घेतलेले दिसत नाही. शिक्षण व वैद्यकीय कारणांसाठी उदारीकृत रेमिटन्स स्कीम अंतर्गत आकारला जाणारा टीसीएस देखील ५ टक्क्यांवरून २ टक्के करण्यात आला आहे. उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि वैद्यकीय उपचारांसाठी जाणाऱ्यांसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

करचोरी करणाऱ्यांसाठी हा अर्थसंकल्प कठोर आहे. जाणूनबुजून चुकीची माहिती दिल्यास थकित कराच्या १०० टक्के दंडाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र प्रामाणिक करदात्यांसाठी आयटीआर भरण्याची मुदत वाढवण्यात आली आहे. पगारदारांसाठी ३१ जुलै, तर नॉन-ऑडिट व्यवसाय आणि ट्रस्टसाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे. कर्करोग आणि मधुमेहाच्या औषधांवरील कर कमी केल्याने उपचार खर्च कमी होणार आहे. बायोफार्मा क्षेत्रासाठी १० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय देशाला मेडिकल टुरिझमचे जागतिक केंद्र बनवण्याचा सरकारचा मानस आहे. पाच प्रादेशिक वैद्यकीय केंद्रांची उभारणी करून उपचार, संशोधन आणि शिक्षण यांचा संगम साधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबादसह ७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा ही या अर्थसंकल्पाची मोठी ताकद आहे. यामुळे प्रवासाचा वेळ कमी होईल, खर्च वाचेल आणि प्रादेशिक विकासाला चालना मिळेल. केंद्र सरकारने बडे प्रकल्प हाती घेतले आहेत, त्यामुळे सर्वसामान्य लोकांचा आर्थिक स्तर उंचावेल असे नाही. २० नवीन जलमार्ग, अंतर्गत जलवाहतूक विकास, मालवाहतूक कॉरिडॉर आणि फ्रेट कॉरिडॉरच्या माध्यमातून लॉजिस्टिक खर्च कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

५०० जलाशये आणि अमृत सरोवरांच्या एकात्मिक विकासामुळे शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळेल. नारळ, काजू, कोको आणि चंदन पिकांना प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. 'भारत-विस्तार' या एआय-आधारित प्लॅटफॉर्ममुळे शेती अधिक वैज्ञानिक आणि फायदेशीर होईल. परंतु सर्वसामान्य शेतकर्यांसाठी या अर्थसंकल्पात ठोस विचार केला नसल्याचे जाणवत आहे. प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी उच्च शिक्षणाची वसतिगृहे, शी-मार्ट्सद्वारे महिला उद्योजिकांना बाजारपेठ, २०३० पर्यंत २० लाख व्यावसायिक निर्माण करण्याचे उद्दिष्ट या घोषणा सामाजिक समावेशावर भर देतात. गेमिंग, कंटेंट आणि डिजिटल क्षेत्रातील संधी ओळखून या क्षेत्रांच्या वाढीवर विशेष भर देण्यात आला आहे. या क्षेत्रात भारताने प्रगती करायची म्हटले तर धंदेवाईक शिक्षण स्वस्त करणे गरजेचे आहे. परंतु शिक्षण सध्या खासगीकरणाच्या युगात महागडे झाले आहे.

एनआरआय गुंतवणूकदारांना थेट शेअर बाजारात गुंतवणुकीस मुभा देण्यात आली आहे. मात्र सट्टेबाजीला आळा घालण्यासाठी एसटीटीमध्ये वाढ करण्यात आली आहे. ऑप्शन ट्रेडिंग महाग होणार असले तरी दीर्घकालीन गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याचा सरकारचा हेतू स्पष्ट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अर्थसंकल्पाचे कौतुक करताना निर्मला सीतारामन यांना नारी शक्तीचे ज्वलंत उदाहरण म्हटले. तर राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार देत राजकीय मौन पाळले. उद्योगविश्वाने अर्थसंकल्पाचे स्वागत केले असले तरी काही तज्ज्ञांनी एसटीटी वाढीवर नाराजी व्यक्त केली आहे, हे महत्वाचे आहे. २०२६ चा अर्थसंकल्प हा मोठ्या कर सवलती देणारा नसला, तरी स्थैर्य, सुलभीकरण आणि दीर्घकालीन विकास यावर भर देणारा आहे. मध्यमवर्गाला थेट मोठा दिलासा नसला, तरी आरोग्य, प्रवास, शिक्षण आणि पायाभूत सुविधांमधून अप्रत्यक्ष फायदे निश्चितच मिळणार आहेत. हा अर्थसंकल्प म्हणजे हळू पण ठाम पावले अशीच ओळख निर्माण करणारा ठरतो.

# राष्ट्रवादीच्या नेतृत्वाचा नवा अध्याय



महाराष्ट्राच्या राजकारणात कायमच निर्णायक भूमिका बजावलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने मोठा आघात झाला आहे. पक्षासाठी हा केवळ एका नेत्याचा मृत्यू नव्हता, तर संघटनात्मक, प्रशासकीय आणि भावनिक पातळीवरची मोठी पोकळी होती. अशा अस्थिर वातावरणात नेतृत्वाचा प्रश्न प्रलंबित राहिला असता तर पक्षात गोंधळ, दिशाहीनता आणि सत्ताकारणातील अस्थैर्य निर्माण झाले असते. मात्र, या पार्श्वभूमीवर अवघ्या दोन दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसने अतिशय वेगाने आणि निर्णायक पाऊल टाकत सुनेत्रा अजित पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड केली. परंतु ही गडबड किंवा घाई राष्ट्रवादी पक्षाच्या विचारधारेच्या दृष्टीने संकटात टाकणारी तर ठरली नाही ना ? असा प्रश्न आता व्यक्त होत आहे.



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

शनिवारी दुपारी विधानभवनातील स्व. ना. अजितदादा पवार यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला उभय सभागृहांतील ४९ पैकी ४६ आमदार उपस्थित होते. काहींच्या मते, ही उपस्थितीच पक्षातील एकजूट आणि नेतृत्वाबाबतचा स्पष्ट संदेश देणारी ठरली. पक्षाचे ज्येष्ठ नेते व मंत्री छगन भुजबळ यांनी विधिमंडळ पक्षनेतेपदी सुनेत्रा पवार यांची निवड करणारा ठराव मांडला. त्याला दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, नरहरी झिरवाळ आणि संजय बनसोडे यांसारख्या अनुभवी नेत्यांनी अनुमोदन दिले. अवघ्या दोन ओळींच्या ठरावावर ४६ आमदारांचा होकार म्हणजे नेतृत्वावर दाखवलेला विश्वासच होता. असे जारी असले तरी पक्षातील काही नेते, राष्ट्रवादी पक्षाच्या नवनेतृत्वाने त्वरीत सत्तेत सहभागी होत उप मुख्यमंत्री पदाची शपथ घेण्यासाठी हवालदिल झाले होते असे वाटते. याचे कारण, स्व.अजितदादा यांचे दुर्दैवी निधन होऊन पाच दिवस झाले आहेत. उप मुख्यमंत्रीपदाची शपथ सर्व संस्कार झाल्यानंतर घेणे योग्य ठरले असते. यात घाई करण्यासारखे विशेष काय होते? राष्ट्रवादी पक्ष फुटणे शक्य नव्हते. कोणत्या नेत्याचे निधन झाल्यानंतर असे होणे शक्य नव्हते. तरीही पदाचा शपथविधी घाईघाईत झाला, हे संशयास्पद वाटते.

या बैठकीपूर्वी सर्व आमदारांनी अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. ही केवळ औपचारिकता नव्हती, तर दादांप्रती असलेली भावनिक नाळ आणि त्यांच्या वारशाची जाणीव होती. विशेष बाब म्हणजे, अजित पवार वक्तशीरपणाबाबत जितके काटेकोर होते, तितक्याच काटेकोरपणे सुनेत्रा पवार बरोबर दोन वाजता विधानभवनात दाखल झाल्या. त्यांनी माध्यमांशी किंवा आमदारांशी कोणताही संवाद न साधता, शांतपणे बैठक पूर्ण केली आणि लगेच बाहेर पडल्या. ही शैली अनेकांना दादांची आठवण करून देणारी ठरली. सुनेत्रा पवार यांची निवड होताच विरोधकांकडून घराणेशाहीचा मुद्दा उपस्थित केला गेला. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेते आणि कार्यकर्ते ही निवड भावनिक नव्हे, तर राजकीय आणि संघटनात्मक गरज असल्याचे सांगत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीकडे सरकारमधील महत्त्वाची खाती होती. ती यंत्रणा ठप्प होऊ नये, प्रशासनावर परिणाम होऊ नये आणि पक्षाची सत्ता टिकून राहावी, यासाठी तातडीने निर्णय घेणे अपरिहार्य होते, असे सांगितले गेले. मात्र अजितदादांकडे असलेले अर्थ खाते विद्यमान मुख्यमंत्र्यांकडे गेले. या घाईत महत्वाचे खाते भाजपकडे गेले.

याच पार्श्वभूमीवर पक्षाचे नेते अविनाश आदिक यांनी केलेली फेसबुक पोस्ट चर्चेत आली. कुटुंबाचा प्रमुख गेल्यावर कुटुंब नेतृत्वाशिवाय राहू शकत नाही, असे सांगत त्यांनी सुनेत्रा पवार यांनी अत्यंत दुःखाच्या क्षणी पुढे येऊन जबाबदारी स्वीकारल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या मते, अराजक टाळण्यासाठी उत्तराधिकारी ठरवणे ही राजकीय अपरिहार्यता होती. परंतु अजितदादा हयात असताना राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या नेत्यांशी झालेल्या तथाकथित संवादाचे काय झाले ? असा प्रश्न सर्वत्र व्यक्त होत आहे. त्या तथाकथित संवादामध्ये, दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येण्याचे बोलणे झाले होते, असा सूर राष्ट्रवादी शरद पवार पक्षातील नेत्यांच्या बोलण्यातून येत आहे. मात्र असा काही ठराव झालाच नव्हता, असे काही नेते आत्ता म्हणत आहेत. मग शपथविधीसाठी घाई का केली? असा प्रश्न व्यक्त होत आहे.

छगन भुजबळ यांनी मांडलेल्या ठरावानुसार, सुनेत्रा पवार यांना विधिमंडळ पक्षनेता म्हणून व्हीप काढण्याचे तसेच विधिमंडळ कामकाज पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व संविधानिक अधिकार देण्यात आले आहेत. या ठरावामुळे पक्षातील निर्णयप्रक्रिया केंद्रीत झाली असून, सरकारमधील राष्ट्रवादी काँग्रेसचा समन्वय अधिक प्रभावीपणे साधला जाणार आहे. सुनेत्रा पवार या सध्या राज्यसभेच्या सदस्य आहेत. मात्र, विधिमंडळ पक्षनेतेपदासाठी सहा महिन्यांत त्यांना विधानसभेच्या एका सभागृहात निवडून येणे आवश्यक आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातून त्या पोटनिवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, ही निवड बिनविरोध होण्याची दाट शक्यता आहे.

### एकजूट की दबलेली अस्वस्थता?

४६ आमदारांची एकमताने दिलेली साथ ही सध्या तरी पक्षातील एकजूट दर्शवते. मात्र, दीर्घकाळात हे नेतृत्व कितपत स्वीकारले जाते, हे आगामी राजकीय निर्णयांवर अवलंबून असेल. सुनेत्रा पवार यांच्यासमोर केवळ दादांचा वारसा पुढे नेण्याचेच नव्हे, तर स्वतःची स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण करण्याचेही आव्हान आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने घेतलेला हा निर्णय म्हणजे भावनिक धक्का आणि राजकीय वास्तव यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. दादांच्या दालनात झालेली ही बैठक केवळ नेतृत्व बदलाची प्रक्रिया नव्हती, तर पक्षाला अराजकतेपासून वाचवणारा निर्णायक क्षण ठरला, असे काही जन म्हणतात. यामागे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊ नयेत हा उद्देश काही जणांचा होता का ? असा प्रश्न निर्माण होत आहे. अर्थात, सत्ताधारी भाजपच्या भूमिकेप्रमाणे सर्व काही घडले. आता सुनेत्रा पवार या दादांच्या मार्गावरून चालत, पक्षाला कितपत स्थैर्य आणि दिशा देतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# मोदी सरकारचा केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ संसदेत सादर

भारतीय केंद्रीय अर्थसंकल्पाची पार्श्वभूमी: भारत स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंत एकूण ७८ वार्षिक केंद्रीय वित्तीय अर्थसंकल्प संसदेमध्ये सादर झालेले आहेत त्यामध्ये सर्वात जास्त स्वर्गीय मा. मोरारजी देसाई यांनी एकूण १० वेळा केंद्रीय वार्षिक आणि मध्यावधी अर्थसंकल्प सादर केले आहेत. त्यांच्यानंतर श्री पी. चिदंबरम यांनी ९ वेळा तर व माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी ८ वेळा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केले आहेत. त्यांच्या खालोखाल यशवंत सिन्हा व महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण साहेब यांनी ७ वेळा संसदेमध्ये केंद्रीय अर्थसंकल्प सादर केले आहेत. तसेच टी.टी. रामकृष्णमचारी व माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी प्रत्येकी ६ वेळा केंद्रीय अंदाजपत्रक सादर केले आहेत.



**डॉ.एन.डी. बनसोडे**
**सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.**

स्वर्गीय श्री. अरुण जेटली यांनी संसदेमध्ये पाच वेळा अर्थसंकल्प सादर केले आहेत. तसेच सध्याच्या केंद्रीय वित्त मंत्री माननीय सौ. निर्मला सीतारामन यांनी आपल्या कारकिर्दीतील नववा आणि अमृत काळातील पाचवा केंद्रीय अर्थसंकल्प रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ ला सादर केला. विकसित भारतासाठी सर्वकष उपाययोजना करण्याच्या अमेरिकेच्या उद्देशाने केंद्रीय वित्त मंत्री मा.सौ. निर्मला सीतारामन यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ लोकसभा अध्यक्ष मा. श्री. ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली सादर केला तो रुपये ५३,४७,३१५ कोटी रुपये कि जो गेल्या अर्थसंकल्पाच्या ५०,६५,३४५ कोटीच्या २,८१,९७० कोटीने जास्त आहे.

अर्थसंकल्पातील काही ठळक मुद्दे खालील प्रमाणे.

● भारताला औषध निर्मिती क्षेत्राचे हब बनवण्यासाठी प्रयत्न केलेजाणार असून त्यामध्ये कॅन्सर आणि शुगर सारख्या धुरंदर आजारावरती औषधे स्वस्त आणि मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणार. त्यासाठी तीन मोठ्या केमिकल पार्कची निर्मिती करण्याचा संकल्प आहे.

● वाढत्या औद्योगिक आणि ऑटोमोबाईल क्षेत्राचा विचार करता सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी ४० हजार कोटींची तरतूद. ● केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू मधील दुर्मिळ खनिज उत्खनन करण्यात येणार. ● वस्त्रोद्योग, हस्तकला, आणि हातमाग उद्योगाला चालना देण्यासाठी मेगाटेक्स्टाईल ची उभारणी केली जाणार त्याचबरोबरच महात्मा गांधी ग्राम स्वराज्य अभियान माध्यमातून आणि एक जिल्हा एक उत्पादनावरती सुद्धा भर देण्यात येणार. ● सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या वाढीवर भर देण्यासाठी भरीव तरतूद आणि बायो फार्म शक्तीसाठी दहा हजार कोटी तरतूद तसेच नवउध्योजकांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी कार्पोरेटमित्राद्वारे उद्योजकांना प्रशिक्षण देण्यात येणार. तसेच आयात कमी करून निर्यात वाढीवर भर देण्यात येणार. ● पाच लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या शहरांच्या पायाभूत सुविधांवर भर देण्यासाठी १२.२ लाख कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ● नवीन वीस जलमार्गाची सुद्धा घोषणा केली असून त्यामाध्यमातून सागरी वाहतूक आणि तरुणांना रोजगाराची निर्मिती करण्यावर भरदेण्यात आला आहे. ● रेल्वे वाहतूक कॉरीडॉर तयार केला जाणार त्यामध्ये महाराष्ट्रा मध्ये मुंबई ते पुणे, पुणे ते हैद्राबाद, हैद्राबाद ते बेंगलोर, बेंगलोर ते चेन्नई, चेन्नई ते दिल्ली, दिल्ली ते वाराणसी असे रेल्वे कॉरिडॉर्स करणार. ● बॉण्डच्या माध्यमातून महानगरांना उभारता येणार १०० कोटीचा निधी उभारता येणार. ● ए आय च्या माध्यमातून सर्व क्षेत्रातील घटकांच्या संशोधन व विकास साधन्यावर भर त्यामध्ये महिला, कृषी, तंत्रज्ञान शिक्षण, आरोग्य, दळण-वळण या क्षेत्रामध्ये ए आय चा मोठ्या प्रमाणात वापर होण्याची शक्यता आहे.

● २५ कोटी लोकांना दारिद्र्य रेषेतून बाहेर काढण्यास सरकार यशस्वी तसेच आयुर्वेद चे शिक्षण देण्यासाठी तीन नवीन संस्था उभारण्यावर सरकारचा भर प्रत्येक जिल्ह्यामध्ये मुलींचे वस्तीग्रह स्थापन करणार त्यामुळे मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन हे महत्त्वाचे ठरणार आहे. ● माऊंटेन ट्रेन हि हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंड मध्ये चालवण्यावरती भर आणि त्यातून पर्यटन विकासास प्रोस्ताहन. ● समुद्री किनाऱ्यावरील शेतकऱ्यांसाठी नारळ संशोधन केंद्र स्थापन केलेजाणार आहे त्याचबरोबर काजू आणि इतर उत्पादनांना जागतिक ब्रँड बनवण्याचा मानस त्यामुळे कोकण वासियांना दिलासा मिळेल.

● ईशान्य कडील राज्यांसाठी बुद्धांच्या निगडित पर्यटन स्थळांना उत्तम दर्जाची स्थळे बनवणीच्या अनुषंगाने भरीव करून सुधारणा करण्यात येणार. ● करांद्वारे मोठ्या प्रमाणामध्ये म्हणजेच २८ लाख कोटी रुपये केंद्र सरकारला महसूल मिळणार. ● चालू आर्थिक वर्षात वित्तीय तूट हि ४.४% राहील ती पुढील वर्षी ४.३% असण्याची शक्यता. ● इन्कम टॅक्स रिटर्न फाईल आता ३१ जुलैपर्यंत भरण्याची मुदत. स्टॉक मार्केट मधील ऑप्शन्स ट्रेडिंग वरील टॅक्स वाढवला जाणार. ● न्यूक्लियर पावर प्लांट साठी लागणाऱ्या साहित्याच्या आयात वरील कस्टम ड्युटी पूर्णपणे कमी त्यामुळे न्यूक्लियर पावर प्लांट चा विकास आणि विस्तार होण्यास मदत होणार. ● महिला उद्योजकांसाठी शी मार्ट उभारणार असून त्यामाध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यावर भर. ● सर्वसामान्य जनेतला या केंद्रीय अर्थसंकल्पच्या माध्यमातून सौर उर्जेची उपकरणे, कॅन्सर संधार्भातील १७ प्रकारची औषधे, क्रीडा साहित्य, कपडे, टीव्ही, मोबाईल आणि फ्रीज कमी किमतीत मिळणार.

● मात्र शूज, दारू, भंगार, सिगारेट, वैध्यकीय उपकरणे महाग होणार आहेत. स्टँडर्ड डिडक्शन हे ७५००० हजारच आहे वाढत्या महागाई च्या तुलनेत या मध्ये वाढ करणे अपेक्षित होते मात्र सरकारने त्यामध्ये कोणताही बदल न केल्यामुळे सर्वसामान्य आणि पगारदार नोकरवर्गाची निराशा झाली आहे.

**● आयकराच्या रचनेमध्ये कोणताही बदल नाही २०२६-२७**

| अनु. क्र. | वार्षिक उत्पन्न मर्यादा | २०२५-२६ कर रक्कम % | २०२६-२७ कर रक्कम % |
|---|---|---|---|
| १. | ० ० ते ४.०० लाख | कर नाही | कर नाही |
| २. | ४.०० लाख ते ८.०० लाख | ५ % | ५ % |
| ३. | ८.०० लाख ते १२.०० लाख | १०% | १०% |
| ४. | १२.०० लाख ते१५.०० लाख | १५% | १५% |
| ५. | १६ लाख ते २० लाख | २० % | २० % |
| ६. | २४.०० ते २४.०० लाख | २५ % | २५ % |
| ७. | २५.०० लाखांपेक्षा जास्त | ३०% | ३०% |

# निस्वार्थ त्यागाची मूर्ती:स्वर्गीय वेणूताई चव्हाण



आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, भारताचे माजी उपपंतप्रधान आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या सहधर्मीनी होत्या. मात्र त्यांची ओळख केवळ एक थोर नेत्याच्या पत्नी पूर्ती मर्यादित न राहता त्या स्वतः निस्वार्थ त्याग, कर्तव्यनिष्ठा, साधेपणा आणि मूल्याधिष्ठ जीवन जगणाऱ्या आदर्श भारतीय स्त्री म्हणून ओळखल्या जातात. सातारा जिल्ह्यातील फलटण येथील मोरे घराण्यात ०२ फेब्रुवारी १९२६ रोजी जन्मलेल्या वेणूताईवर लहानपणापासूनच देशभक्ती, साधेपणा आणि संस्कारांची घडण झाली. शांत, सोज्वळ, करारी आणि शालिनी स्वभावाने त्यांचे बालपण समृद्ध झाले. लग्न करायचेच असेल तर 'देशभक्ताशीच' हा त्यांचा ठाम निश्चय होता. त्यानुसार ०२ जून १९४२ रोजी कराड येथील 'मराठा बोर्डिंग' च्या आवारात यशवंतराव चव्हाण यांच्याशी त्यांचा विवाह संपन्न झाला. विवाह नंतर लगेच १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या काळात यशवंतराव चव्हाण भूमिगत झाले. त्या अत्यंत कठीण आणि धोक्याच्या काळात वेणूताईंनी पोलिसांच्या दडपशाहीला धैर्याने तोंड दिले. विवाहानंतर ची पहिली संक्रांत असतानाच घरावर छापी टाकले गेले, चौकशी झाली, तरीही त्यांनी प्रसंग अवधान आणि संयमाने परिस्थिती हाताळली. अल्पवयीन असूनही त्यांच्यातील समंजसपणा आणि मानसिक कणखरपणा विलक्षण होता. यशवंतराव चव्हाण राजकारणात सक्रिय असताना घरातील सर्व जबाबदाऱ्या वेणूताईनी समर्थपणे सांभाळल्या. गरिबी, संघर्ष आणि अनिश्चिततेच्या काळात त्यांनी पतीला मोलाची साथ दिली. मुख्यमंत्री व उपपंतप्रधान यांची पत्नी असूनही त्यांनी कधीही सत्तेचा किंवा पदाचा वापर स्वतःसाठी केला नाही. सक्रिय राजकारणापासून दूर राहून त्यांनी पतीच्या सार्वजनिक जीवनाला नैतिक बळ दिले. त्यांच्या निस्वार्थ साथीमुळेच यशवंतराव चव्हाण निर्धास्तपणे देश सेवेसाठी स्वतःला झोकून देऊ शकले. यशवंतराव चव्हाण राजकीय जबाबदाऱ्यांमुळे बहुतेक वेळा घरापासून दूर असत. त्या काळात संपूर्ण कुटुंब, नातेवाईक, आप्तेष्ट आणि घरात येणारा असंख्य कार्यकर्त्यांची जबाबदारी वेणूताईंनी अत्यंत प्रेमाने, संयमाने आणि मायेने सांभाळली. मातृत्व, करुणा आणि माणुसकी यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येत असे.



**प्रा.डॉ.अमरवेली पाटील**
**वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड**

त्यांचे राहणीमान अत्यंत साधे होते. दाग दागिन्यांची मिरवणूक त्यांना कधीच आवडली नाही. चंदेरी व खादीच्या साड्या, साधे मंगळसूत्र आणि शालिनी वेश हेच त्यांचे वैशिष्ट्ये होते. त्यांच्या डोक्यावरचा पदर कधीही घसरला नाही, हे त्यांच्या चारित्र्याचे संस्काराचे आणि आत्मसन्मानाचे प्रतीक मानले जाते. वेणूताई चव्हाण या केवळ एका महान नेत्याच्या पत्नी नव्हत्या तर त्या निस्वार्थ, त्याग, धैर्य, संयम, सामाजिक बांधिलकी यांचे 'मूर्तीमंत प्रतीक' होत्या. इतिहासातील महान स्त्रियांच्या परंपरेत त्यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना घडवणाऱ्या राजमाता जिजाऊ, मेरी झाशी नही दूंगी, असे ठणकावून सांगणाऱ्या राणी लक्ष्मीबाई आणि स्त्रियांना शिक्षणाचे दारे खुले करून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला वंदन करताना, त्याच प्रेरणास्त्रोत परंपरेत स्वर्गीय वेणूताई चव्हाण यांचे कार्य उल्लेखनीय ठरते. पडद्यामागे राहून त्यांनी दिलेले सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक योगदान आजच्या पिढीसाठी आदर्श आहे. अनेक थोर पुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी आपण साजरा करतो. मात्र समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या वेणूताईसारख्या स्त्री व्यक्तिमत्त्वाचे स्मरण होणे तितकेच आवश्यक आहे. म्हणून त्यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करणे आणि ते पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. महानतेचा खरा अर्थ पदात नसून त्यागात, कर्तुत्वात आणि मौनसेवेत दडलेला असतो यशवंतराव हे दिल्लीत महाराष्ट्राचे वैभव स्थान होते, तर वेणूताई महाराष्ट्रीय संस्कृतीचे प्रतीक. मंत्र्यांची पत्नी कशी असावी? तिचा पेहराव, वागणूक कशी असावी? त्यांच्या त्या आदर्श होत्या. वेणूताईंचे पाहुण्यांना, नातेवाईकांना, अधरतिथ्य आश्चर्यचकित करत असे. त्यांच्याकडे काम करणाऱ्यांची सुखदुःखे त्या आपली समजत. महाराष्ट्रातील सर्व सण त्या उत्साहाने साजरे करत. नरक चतुर्थीला बंगल्यातील सर्वांच्या घरी अगदी साडेसात, आठ लाच फराळाचे ताटे येत असत. वेणूताईना मंगळसूत्रा खेरीज इतर दागिन्यांची मुळीच हौस नव्हती. वेणूताई यांच्या जीवनातील सुसंस्कृतपणा पदोपदी जाणवतो.

वेणूताई यांच्या आयुष्यात कराड हा महत्त्वाचा विसावा आहे. अगदी शेवटच्या काळामध्ये त्यांनी यशवंतरावांना विरंगुळा हे घर घ्यायला लावले. आपल्या परिसराशी, प्रदेशाशी फार नाळ जुळवून घेणाऱ्या त्या होत्या. त्याच ठिकाणी कराडवासीयांसाठी, पुस्तक प्रेमी, विद्यार्थी, ग्रामस्थ व ज्येष्ठ नागरिकांच्या ज्ञान विकासासाठी 'वेणूताई चव्हाण स्मारक प्रतिष्ठान' उभारण्यात आले आहे. ते आजही सांस्कृतिक, शैक्षणिक व बौद्धिक प्रेरणेचे केंद्र म्हणून कार्यरत आहे. महानतेचा खरा अर्थ पदात नसून त्यागात, कर्तुत्वात आणि मनसेवेत दडलेलं असतो. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण या केवळ एका महान नेत्या होत्या. त्यांच्या जीवनातून स्त्री शक्तीचा सन्मान, साधेपणाची महान, महानता आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांच्या विचारांनी व कार्याने अनेक पिढ्यांना दिशा दिली आहे. अशा महान सामाजिक, व्यक्तिमत्त्व असणाऱ्या वेणूताईंची ०१ जून १९८३ रोजी अखेरची प्राणज्योत मालवली. अशा या थोर, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व व समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या स्वर्गीय सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांना शतशः प्रणाम, शतशः वंदन आणि शतशः अभिवादन.

# अनिवासी भारतीयांच्या व भारतातील रीटेल क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत ताज्या अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते

## मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांची प्रतिक्रिया

मुंबई/प्रतिनिधी: -

भारतीय अर्थव्यवस्था पुढील दोन-तीन वर्षांतच जगातील तिसरी मोठी अर्थसत्ता बनू शकेल. तशा संधीही आपल्याला चालून आल्या आहेत. ब्रिटन, न्यूझिलंड संयुक्त अरब अमिरात, युरोपीय महासंघ यांच्याशी झालेल्या व्यापारी करारांमुळे निर्यातवाढीत मोठी झेप अपेक्षित आहे. मात्र त्याचवेळी अनिवासी भारतीयांकडून भारतात गुंतवणुकीला प्रोत्साहनाबाबत, तसेच भारतातील रीटेल क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याबाबत ताज्या अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते, अशी अपेक्षा दुबईस्थित अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्सचे अध्यक्ष व मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी बोलून दाखवली आहे.

आज जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत करताना ते म्हणाले, भारतीय अर्थव्यवस्थेला प्रचंड ताकद देण्याचे सुप्त सामर्थ्य रीटेल क्षेत्रात आहे, परंतु भारतात एकतर या क्षेत्रात खूप कमी व्यावसायिक आहेत आणि जे आहेत ते उच्च करांच्या दडपणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सक्षमतेने स्पर्धा करु शकत नाहीत. त्यावर उपाय म्हणून सरकारने हे व्यावसायिक व सर्वसामान्यांवरील करांचे ओझे कमी करावे आणि अनिवासी भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतातील रीटेल क्षेत्रात थेट गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन द्यावे.



ते पुढे म्हणाले, भारतातील प्रचंड लोकसंख्येच्या तुलनेत तसेच रीटेल बाजारपेठेही प्रचंड उलाढालीची असताना या क्षेत्रात व्यावसायिकांची संख्या अद्यापही पुरेशी नाही. त्यामुळे भारतीय परदेशात जाऊन व्यवसाय करतात पण देशात मात्र मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत नाही परदेशांच्या तुलनेत स्थानिक वेतनमानही आकर्षक नसते. यावर उपाय म्हणून सरकारने अनिवासी भारतीय व आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतीय रीटेल क्षेत्रात आकर्षित करुन कर सवलती दिल्यास तसेच परकी थेट गुंतवणुकीस (एफडीआय) प्रोत्साहन दिल्यास येथे नव्या नोकऱ्या आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, कर्मचाऱ्यांना चांगले वेतनही मिळेल आणि व्यावसायिकांची संख्या वाढल्यास स्पर्धात्मकतेमुळे वस्तूंच्या किंमती कमी होऊन सर्वसामान्यांना वस्तू स्वस्तात मिळतील. अनेक अनिवासी भारतीय जगभरात उत्तम व्यवसाय करतात, पण भारतात गुंतवणुकीस राजी होत नाहीत. हे चित्र बदलणे गरजेचे आहे.

भारतातील रीटेल क्षेत्रात प्रचंड सुप्त सामर्थ्य आहे आणि आगामी काळ भारतासाठी अत्यंत आश्वासक आहे, असे स्पष्ट करताना डॉ. दातार म्हणाले, की काही वर्षांपूर्वी भारत खरेदीदारांची बाजारपेठ (बायर्स मार्केट) होता तो आज विक्रेत्यांची बाजारपेठ (सेलर्स मार्केट) बनला आहे.

# सोलापूर चा महापौर खुला की आरक्षित जागेवरून होणार

## दोन गटात चुरस वाढली

सोलापूर/महेश गायकवाड:-

सोलापूर चे महापौर हे खुले गटासाठी आरक्षित झाले आहे परंतु भाजप ने महापौर पदासाठी खुला की ओबीसी किंवा आरक्षित जागेवरील व्यक्तीला संधी देणार या कडे सर्वांचे लक्ष वेधून घेण्यात आले आहे.

भाजपा गटनेतेपदी माजी उप महापौर नरेंद्र काळे यांची भाजपचे सोलापूर महानगरपालिका गट नेता म्हणून निवड झाली असल्यामुळे आता लक्ष्य महापौर पदावर लागून राहिले आहे. महापौर हा खुला की आरक्षित गटामधून होणार याचीच सद्या सोलापुरात जोरदार चर्चा सुरू झाली आहे ही चुरसभाजप मधील दोन गटात सुरू झाली आहे.



मनपात सत्ताधारी भाजपा गटनेतेपदी बावनकुळे समर्थक नरेंद्र काळे यांची अपेक्षेप्रमाणे वर्णी लागली असून आता लक्ष्य महापौर पदाकडे लागले असून हे पद खुले की आरक्षित प्रवर्गाकडे जाणार ही उत्सुकता असतानाच दोन गटामध्येच चुरस दिसून येत आहे. निर्वाचितांमध्ये इनकमिंग नगरसेवकांची संख्या मोठी असून इनकमिंग पैकीच एकजण शहराचा/ची पहिला/पहिली नागरिक ठेल असा तर्क आहे.

भाजपा गटाची नोंदणी करणेसाठी ८७ निर्वाचित सदस्यांचे शिष्टमंडळ शनिवारी पुण्यास गेले होते. या नोंदणीप्रसंगी गटनेत्याची औपचारिक घोषणाच अपेक्षित होती आणि चर्चेत ज्यांचे नाव आघाडीवर होते, ते नरेंद्र काळे यांच्या नावावर भंडारा उधळणार हीच शक्यता अधोरेखित झाली. आता लक्ष्य महापौर निवडीकडे लागले आहे. खुल्या प्रवर्गासाठी आरक्षण निघाले आहे. त्यामुळे गटनेता कोण होणार याची उत्सुकता होती. कारण महापौरपदाचे उत्तर गटनेतेपदात दडले आहे.

नरेंद्र काळे यांचे नाव महापौरपदाच्या चर्चेत होते, फक्त ते आणले गेले. त्यासाठी अन्य नावांचीही फक्त जोड दिली गेली होती. गटनेता पुरुष झाला तर महिला महापौर होईल,असा एक अंदाज वर्तविला जात आहे. पण त्यामध्ये कितपत तथ्य आहे? पक्षात पूर्वी दोन गट होते, त्यांनी/त्यांना या सर्व घडामोडींपासून अंतर ठेवले मुळे उर्वरित दोन गटात महापौर पदासाठी चुरस असल्याची चर्चा पुणे येथे गट नोंदणीसाठी गेलेल्या नगरसेवकांमध्ये होती.

नरेंद्र काळे यांची गटनेते म्हणून वर्णी लागली,त्यामुळे साहजिकच ते सभागृहनेते होतील. कदाचित यापेक्षा मोठी जबाबदारी दिली तर? आश्चर्य वाटू नये. काळे बावनकुळे समर्थक मानले जातात. त्यांचे पक्षाध्यक्षपद गेल्यानंतर ऑगस्टमध्ये झालेल्या एका कार्यक्रमास मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आवर्जून उपस्थित होते. त्यांचे पालकत्व स्वत:कडे घेतले असे मानले गेले. रवींद्र चव्हाण विद्यमान प्रदेशाध्यक्ष असले तरी बावनकुळे अजूनही त्याच फ्रेममध्ये आहेत, कारण मनपा निवडणूक निकाल लागल्यानंतर बावनकुळे यांनी सर्व निर्वाचित नगरसेवकांना व्यक्तिशः अभिनंदनाचे पत्र पाठवले होते, अनेक निर्वाचितांनी सो.मि.वर ते पत्र आवर्जून व्हायरल केले होते. त्यामुळे गटनेता आणि महापौर निवडीत बावनकुळे पडद्यामागची भूमिका पार पाडतील असे मानले जाते. तसे झालेच तर?

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

## जिल्ह्यात मॉडेल स्कुल आणि स्मार्ट पीएचसी योजना राबवून
# प्राथमिक शिक्षण आरोग्याच्या व्यवस्था अद्यावत केल्याचा आनंद

### आ.जयंत पाटील

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**

आपण सांगली जिल्ह्यात मॉडेल स्कुल आणि स्मार्ट पीएचसी या योजना राबवून जिल्ह्यातील जनतेच्या प्राथमिक शिक्षण आणि आरोग्याच्या व्यवस्था अद्यावत केल्याचा आपणास आनंद आहे. स्व. अजितदादांनी या योजनांचे विधीमंडळात कौतुक केल आहे. सध्या या योजना राज्याच्या अनेक जिल्ह्यात राबविल्या जात असून, त्याचा आपल्या जिल्ह्यास निश्चित सार्थ अभिमान आहे, असा विश्वास माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी दूधगांव येथील जाहीर सभेत बोलताना व्यक्त केला.

कवठेपिरान जि.प. मतदारसंघातील उमेदवारांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आमच्या उमेदवारांचा विजयी निश्चित आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कवठेपिरान जिल्हा परिषद मतदारसंघाच्या उमेदवार सौ. मिना सचिन पाटील, पंचायत समितीचे उमेदवार अरविंद सपकाळ, दुधगाव पंचायत समितीच्या उमेदवार सौ. स्नेहल सुरज पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या शालिनीकाकी कदम, युवा नेते सचिन पाटील (कवठेपिरान), माजी पंचायत समिती सदस्य प्रमोद आवटी, माजी उप सरपंच विलास आवटी,उपसरपंच अविनाश भोसले, डॉ.डी.बी. पाटील, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सुभाष पाटील, मयूर पाटील, काँग्रेस पक्षाचे संदीप आडमुठे, तुंगचे भास्करराव पाटील, धनाजी पाटील, सावळवाडीचे राहुल माणगांवे, नितीन दणाणे, नाना माणगांवे, बबलू जाधव, माणिकराव व्हसकुले, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बाळासाहेब पाटील, सुस्मिता जाधव, सुनिता देशमाने, संग्राम जाधव, तिन्ही उमेदवार प्रामुख्याने उपस्थित होते.




विलास आवटी म्हणाले, या मतदारसंघातील उमेदवारीबाबत आ.जयंतराव पाटील, माजी खा. राजू शेट्टी व खा. विशाल पाटील यांच्यामध्ये बरीच चर्चा झाली. मात्र ती फलद्रूप होऊ शकली नाही.

तरी स्वाभिमानीच्या अनेक नेत्यांच्यासह अनेक पक्षांनी आपल्या उमेदवारांना पाठिंबा दिला आहे.

सुनिता देशमाने म्हणाल्या, माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्या माध्यमातून आपल्या गावात १६ कोटी रुपयांची कामे झाली आहेत. सुस्मिता जाधव म्हणाल्या, माजी मंत्री आ.जयंतराव पाटील हे आपल्या गावाच्या सुख - दुःखाशी समरस झालेले नेतृत्व आहे.

युवक तालुकाध्यक्ष संग्राम जाधव, तुंगचे नेते भास्करराव पाटील, धनाजी पाटील राजारामबापू दूध संघाच्या संचालिका सौ.उज्ज्वला पाटील, डॉ.डी.बी.पाटील, उपसरपंच अविनाश भोसले, सहकार बोर्डाचे सदस्य संदीप आडमुठे यांचीही भाषणे झाली. हे गांव कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराचा वारसा जपणारे, सुशिक्षित लोकांचे गांव आहे. या गावातील मतदार सुशिक्षित आणि कामाच्या माणसांना निश्चित साथ देतील, असा त्यांनी विश्वास व्यक्त केला.

# कराड-पाटण परिसरासाठी डब्ल्यू. आर.के.कडून एकच हेल्पलाईन

**कराड/प्रतिनिधी : –**

कराड व पाटण तालुक्यातील नागरिकांच्या सुरक्षिततेसह पर्यावरण व प्राणीसंवर्धनासाठी कार्यरत असलेल्या WRK (वाइल्डहार्ट रेस्क्यूअर नाईट्स) या सामाजिक संस्थेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत संपूर्ण कराड-पाटण परिसरासाठी एकच अधिकृत हेल्पलाईन क्रमांक सुरू केला आहे. त्यामुळे सर्पदंश, सर्प आढळणे किंवा अपघातग्रस्त व जखमी प्राण्यांच्या मदतीसाठी नागरिकांना आता अधिक सोयीस्कर आणि जलद सेवा उपलब्ध होणार आहे.

WRK ही संस्था कराड शहर व परिसरातील सर्पमित्र व प्राणिमित्रांनी एकत्र येऊन स्थापन केली असून, गेल्या अनेक वर्षांपासून ती निःस्वार्थ भावनेने सामाजिक कार्य करत आहे. आतापर्यंत अनेक वेळा रात्री-अपरात्री केवळ एका फोन कॉलवर WRK चे सर्पमित्र घटनास्थळी दाखल होऊन सर्पांना सुरक्षितपणे पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्याचे कार्य करत आहेत. त्यामुळे सर्पदंशाचे धोके टळून अनेक नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

यासोबतच रस्ते अपघातात जखमी झालेले प्राणी किंवा आजारी अवस्थेत आढळणाऱ्या प्राण्यांवर तात्काळ उपचार करून त्यांचे प्राण वाचवण्याचे उल्लेखनीय कार्य WRK च्या प्राणिमित्रांकडून सातत्याने केले जात आहे. हा उपक्रम केवळ मानवी सुरक्षिततेपुरता मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षण व जैवविविधतेच्या संवर्धनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे.

या सामाजिक बांधिलकीतून WRK ने आता कराड-पाटण परिसरासाठी ७५५८५५५४१५ हा एकच हेल्पलाईन क्रमांक सुरू केला आहे. यापुढे सर्पमित्र किंवा प्राणिमित्रांचे वेगवेगळे संपर्क क्रमांक शोधण्याची गरज भासणार नाही. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत या क्रमांकावर संपर्क साधून घटनास्थळाची अचूक माहिती दिल्यास WRK कडून तातडीने मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. एकच संपर्क क्रमांक उपलब्ध करून देत WRK ने सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले आहे.

या उपक्रमाबद्दल दक्ष कराडकर ग्रुपच्या वतीने WRK टीमचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे समाजात जागरूकता वाढून आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर मदत मिळण्यास मोठा हातभार लागतो, असेही त्यांनी नमूद केले. WRK च्या या उपक्रमामुळे कराड-पाटण परिसरातील नागरिकांना आता अधिक जलद, विश्वासार्ह आणि प्रभावी मदत मिळणार असून, पर्यावरण व प्राणीसंवर्धनाच्या चळवळीला नवे बळ मिळणार आहे.

# महिलांच्या सक्षम सबलीकरणासाठी भाजपाच्या पाठीशी उभे रहा

### आ.चित्राताई वाघ

**पाटण/प्रतिनिधी:–**

गोकुळ तर्फ पाटण (कोयना) पंचायत समिती गणातील भाजपच्या उमेदवार सौ. वैशाली बबन कांबळे या सुशिक्षित आणि अभ्यासू आहेत. त्यांच्या वक्तृत्वावरुन त्यांना महिलांच्या समस्यांची जाणीव दिसते. कोयना विभागातील दुर्गम भागातील समस्यांची जाणीव दिसते. पंचायत समितीच्या माध्यमातून त्या नक्कीच कोयना विभागातील समस्यांची चांगल्या प्रकारे सोडवणूक करतील असा विश्वास व्यक्त करुन महिलांच्या सक्षम सबलीकरणासाठी भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आवाहन महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षा आ. चित्राताई वाघ यांनी कोयना येथे बोलताना केले.

गोकुळ तर्फ हेळवाक पंचायत समिती गणातील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार सौ.वैशाली बबन कांबळे यांच्या प्रचारार्थ कोयना येथे झालेल्या सभेत आ. चित्राताई वाघ बोलत होत्या त्या पुढे म्हणाल्या भाजप हा एकमेव असा पक्ष आहे तो महिलांच्या प्रगतीसाठी नेहमी प्रयत्न करतो. महिलांच्या प्रगतीसाठी विविध योजना राबवून त्यांना स्वावलंबी बनविण्याचा नेहमीच प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून होत असतो. महिला स्वावलंबी झाली की घर, राज्य, देश, राष्ट्र स्वावलंबी व्हायला वेळ लागणार नाही. दुर्गम अशा कोयना विभागात महिलांच्या समस्या अद्याप सुटलेल्या दिसत नाहीत.

महिलांच्या समस्या सुटल्या की ऑपऑप कुटुंबातील सर्वांच्या समस्या सुटतात म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महिलांचे सक्षमीकरण, सुरक्षितता व आत्मनिर्भरतेचा संकल्प महिला सबलीकरणाचे व्हिजन समोर ठेवले आहे. असे सांगताना आ.चित्राताई वाघ पुढे म्हणाल्या या मतदारसंघात विकास कामांच्या नावाखाली निकृष्ट कामे व वाढता भ्रष्टाचार याबाबत मतदार संघात समोर आलेली वास्तव स्थिती मांडली अशा भ्रष्ट प्रवृत्ती विरोधात महिला भगिनींनी जागरूक राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.



यावेळी याज्ञेसिंह पाटणकर, सौ. ऐश्वर्यादेवी पाटणकर, सौ.वैशाली कांबळे, दत्तात्रय (बाळासाहेब) कदम, राजाभाऊ शेलार, नंदकुमार सुर्वे, बबन कांबळे, पंकज गुरव, सचिन कदम, विलास काटे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने मोठ्या संख्येने गोकुळ तर्फ हेळवाक कोयना विभागातील महिला, नागरिक उपस्थित होते.

# स्व.वेणूताई यशवंतराव चव्हाण यांचा जन्मशताब्दी सोहळा कराडमध्ये उत्साहात साजरा होणार

### २ ते ९फेब्रुवारीदरम्यान विविध सामाजिक-शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन

**कराड/प्रतिनिधी : –**



महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवन समृद्ध करणाऱ्या स्व. वेणुताई यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी निमित्त कराड येथे भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री शिवाजी शिक्षण संस्था कराड, उच्च शिक्षण मंडळ (वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड) व स्व. वेणुताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या संयुक्त विद्यमाने हा जन्मशताब्दी सोहळा दि. २ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. या निमित्ताने विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

स्व. वेणूताई चव्हाण यांनी आपल्या सहजीवनातून स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या सार्वजनिक व कौटुंबिक जीवनाला मोलाची साथ दिली. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा, कर्तृत्व आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होते. अशा या आदर्श व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने हा जन्मशताब्दी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याचा सांगता समारंभ सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड येथील कलारंजन सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून, नागरिक, शिक्षणप्रेमी, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील, उपाध्यक्ष अल्पाफहुसेन मुल्ला यांनी केले आहे.

# पुतळाबाई महाडीक यांचे निधन

**कडेगांव/प्रतिनिधी:–**



कडेगांव तालुक्यातील चिंचणी (अं.) येथील पुतळाबाई पोपट महाडीक (वय:८५) वृद्धापकाळाने शुक्रवारी सायंकाळी निधन झाले.
जनसेवा उद्योग समूहाचे संस्थापक विश्वास पोपट महाडिक भाऊ यांच्या मातोश्री होत.त्याच्या पाश्चात्य तीन मुले, सुना तसेच नातवंडे आहेत.

रक्षा विसर्जन तसेच सर्व विधी सोमवार, दि.२ फेब्रुवारी रोजी चिंचणीतील हणमंतनगर येथे सकाळी ९ वाजता स्मशानभूमीत करण्यात येणार आहे.

## कवठे येथील किसनवीर स्मारकामध्ये ओझर्डे जिल्हा परिषद गटातर्फे
# कै.अजितदादा पवार यांची शोकाकुल वातावरणात शोकसभा संपन्न

**वाई/प्रतिनिधी:–**

कै. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने समाजाच्या सर्व स्तरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

अजितदादा यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्या साठी कवठे येथील क्रांतिवीर किसन वीर स्मारका मध्ये ओझर्डे जिल्हा परिषद गट व गणातील हजारो ग्रामस्थांची शोकसभा संपन्न झाली. या शोकसभे साठी ओझर्डे गटातील तसेच कवठे परिसरातील अजितदादा प्रेमी हजारोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. अजीत पवारांनी सातारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यान वर भरपूर प्रेम केले आणी गावागावांचा विकास करण्यासाठी भरभरून निधी दिल्यामुळेच जिल्हा आणी तालुक्यातील गावे विकासांच्या उंबरठ्यावर आज ऊभी दिसतात ऐसा नेता पुन्हा होणे नाही असे शब्द राज्यातील प्रत्येक कार्यकर्त्याच्या तोंडातुन ऐकीवात येत आहेत .

यावेळी कार्यक्रमा अगोदर सुमधुर भजनांचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या सभेत सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष महादेव मस्कर , गुळूंब गावातर्फे गणेश जाधव , ना. मकरंद पाटील पतसंस्था व देगाव गावातर्फे विजय इथापे, बोपेगाव तर्फे विठ्ठल शिंदे, गुळूंब गावातर्फे अंकुशराव जाधव, वेळे गावातर्फे शशिकांत पवार, केंजळ गावातर्फे



कवठे येथील शोकसभेत बोलताना जिपच्या उमेदवार आणी यशवंत शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षा वृषालीताई चव्हाण

अनिल जगताप, कवठे गावातर्फे सत्यजित वीर, सुरूरच्या राष्ट्रवादी जिप गटाच्या उमेदवार वृषालीताई चव्हाण, केंजळ गणाचे उमेदवार शैलेंद्र सपकाळ, ओझर्डे गणाच्या उमेदवार हर्षदा फरांदे, संपूर्ण ओझर्डे जिल्हा परिषद गटातर्फे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सातारातर्फे प्रतापराव पवार यांनी आपला शोक व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन विठ्ठल माने यांनी केले.

या कार्यक्रमातील वक्त्यांनी दादांनी सातारा जिल्ह्यात केलेल्या विकास कामांचा त्याच बरोबर किसनवीर आणी खंडाळा असे दोन्ही सहकारी साखर कारखाने अडचणीतुन बाहेर काढून नवी संजीवनी देवुन शेतकऱ्यांचे प्रपंच फुलवले यांचे भान पाच तालुक्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना नक्की आहेच हे सर्व घडले ते फक्त कैं .अजीतदादा पवार यांच्या मुळेच. अनेक वक्त्यांनी सातारा जिल्ह्याच्या जवळीकतेचाउल्लेख करून अजितदादा पवार यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे नुकसान झालेच परंतु सातारा जिल्ह्यावर दादांचे विशेष प्रेम असल्याने जिल्ह्याला त्यांनी भरभरून दिल्याचे मत यावेळी वक्त्यांनी बोलताना व्यक्त केले. ओझर्डे जिल्हा परिषद गटातील कवठे - केंजळ योजना मार्गी लावण्यासाठी अजितदादांनी केलेले विशेष प्रयत्न तसेच वाई तालुक्यातील भुईंज येथील असलेला किसन वीर कारखाना पुन्हा ऊर्जितावस्थेत आणण्या साठी नामदार मकरंद पाटील यांनी केलेल्या प्रयत्नांना केवळ अजितदादांच्या मुळेच यश आल्याचे व त्यामुळे परिसरातील शेतक-यांच्या ऊस शेतीच्या प्रश्नास मदत झाल्याचे आवर्जून यावेळी वक्त्यांनी सांगितले.

अजितदादांनी आयुष्यभर जोपासलेल्या विचार धारेवर चालणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली होईल असे उदगार यावेळी वक्त्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी पसायदान होऊन उपस्थितांनी अजितदादांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका शांततेने पार पाडाव्यात :उज्ज्वला गाडेकर

**वडूज/प्रतिनिधी : –**

सात फेब्रुवारी रोजी होत असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका शांततेत आणि यशस्वीपणे पार पाडाव्यात. त्यासाठी प्रशासनाची जय्यत तयारी झाली असून, जनतेने शांततेत निवडणुका पार पडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन सहायक निवडणूक अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती उज्ज्वला गाडेकर यांनी केले. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर समाजातील विविध घटकांना आवाहन करताना त्या म्हणाल्या, जिल्हा परिषद, पंचायत समिती साठीच्या निवडणुका ७ फेब्रुवारी रोजी होत असून, मतमोजणी ९



फेब्रुवारी रोजी पार पडणार आहे. निवडणुकीच्या संपूर्ण व्यवस्थेसाठी विशिष्ट कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. आचारसंहिता, एक खिडकी, जनजागृती, मनुष्यबळ अशा विविध कक्षातून निवडणूक नियोजन, नियंत्रण आणि व्यवस्थापन करण्यात आले आहे. निवडणूक हा संघर्ष नसून लोकशाहीचा उत्सव आहे, अशा भावनेतून जनतेने प्रशासनाला सहकार्य करावे. प्रशासन, पोलीस यंत्रणा, राजकीय पक्ष व उमेदवार, मतदार तसेच समाज आणि माध्यमे अशा सर्वच घटकांनी परस्पर सामंजस्याने आपली भूमिका पार पाडल्यास निवडणुका यशस्वीरित्या पार पडणार आहेत.

सोशल मीडियाचा योग्य वापर करून सत्य माहिती हीच प्रसारित करावी. मतदारांनी निवडणूक काळात कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. कोणत्याही निवडणूक विषयक शंकेच्या समाधानासाठी प्रशासनाशी तत्काळ संपर्क साधावा. आचारसंहिता पालन करावी. संयम आणि शिस्त पाळावी. दुर्दैवाने कोणताही वाद निर्माण झाल्यास शांतता भंग होऊ न देता कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा व तत्काळ प्रशासनाशी संपर्क साधावा. शंभर टक्के मतदान करून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन देखील श्रीमती गाडेकर यांनी केले आहे.

# श्री संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोकनेते हणमंतराव पाटील मुकबधिर विद्यालयात विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

**विटा / प्रतिनिधी:–**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील विटा - सांगली रोड येथे असणारे अनाथांचे नाथ म्हणून लोकनेते हणमंतराव पाटील मुकबधिर विद्यालय मूकबधिर विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे समाजोपयोगी काम करते. मुकबधिर विद्यार्थ्यानी शिक्षण घेतले पाहिजे, यासाठी माजी नगराध्यक्ष, माजी आमदार लोकनेते कै. हणमंतराव पाटील ( साहेब) यांनी या शाळेचा पाया रचला. या लोकनेते हणमंतराव पाटील (साहेब) निवासी मुकबधिर विद्यालयात दर वर्षी श्री संत रोहिदास जयंती साजरी करत संपत रघुनाथ कांबळे व उदय संपत कांबळे या कांबळे परिवाराकडून श्री संत रोहिदास महाराजांच्या जयंती निमित्त या



विद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार, पोलीस मित्र शिराज शिकलगार यांच्या हस्ते श्री संत रोहिदास महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले व अभिवादन करण्यात आले. या वेळी कांबळे परिवारांनी श्री संत रोहिदास महाराज यांच्याही प्रतिमेचे पूजन केले व श्रीफळ वाढवून धार्मिक विधीप्रमाणे आरती करत हा कार्यक्रम पार पडला.

माजी आमदार ड.सदाशिवराव( भाऊ) पाटील यांच्याकडे विद्यालयाची जबाबदारी होती, युवा नेते माजी नगराध्यक्ष वैभव (दादा) पाटील यांनी विद्यालयाची धूरा संभाळून आपले कर्तव्य पार पाडत आहेत. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष काळोखे सर यांच्या मार्गदर्शनाखाली वसतीगृह अधिक्षक संजय कांबळे सर यांनी आपले विचार व्यक्त करत पत्रकार शिराज शिकलगार व संपत रघुनाथ कांबळे व उदय संपत कांबळे कांबळे परिवार यांचे स्वागत व अभिनंदन केले.

यावेळी पत्रकार शिकलगार यांनी विद्यार्थ्यांना श्री संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने आपले विचार व्यक्त करत त्यांचे महात्म्य सांगितले. विद्यालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचे व कांबळे परिवारांचे आभार मानण्यात आले.


दै.प्रीतिसंगम दि. ०२.०२.२०२६

**NAME CHANGS**

MY OLD NAME WAS MUJUBUL MAKBUL KHAJI AND MY NEW NAME IS MUZIB MAKBUL KHAZI



# आज का अंदाज

**सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ३ - ६ - ७ - ० | ४ - ५ - ८ - ९ |
| १३९-६००-३७७-३७० | २३९-६९०-३५०-२७० |
| २५६-१६९-५६६-४६० | ५९०-१४०-२६०-४६९ |
| ३००-२७७-४५८-५५० | ३३८-४५६-१७०-३७९ |
| **जोडी** | **जोडी** |
| ३१ - ६१ - ७८ - ०८ | ४३ - ५३ - ८२ - ९२ |
| ३९ - ६९ - ७४ - ०४ | ४० - ५० - ८७ - ९७ |
| ३२ - ६२ - ७५ - ०५ | ४१ - ५१ - ८६ - ९६ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि.०२-०३ फेब्रुवारी
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६**

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | १० | २० | ५९ | ८९ |
| | १६ | २६ | ५७ | ८७ |
| | १४ | २४ | ५९ | ८३ |
| | १४६ | ४८० | १५९ | २८८ |
| | ४७० | ५७० | २५८ | ३७८ |
| | ३८० | ६६० | ३५७ | ४६८ |

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट |
|---|---|
| ३७० ४६० ५५० **०** ४७० ३८० ५६० **१** ६७० ५८० ४९० **३** | २३४ ३७९ ४७८ **९** ४९९ ५७० ६६० **२** १५९ २५८ ३५७ **५** |

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट |
|---|---|
| ११० २०० ३९० **२** ४०० ३३८ ५९० **४** १६९ २६८ ३६७ **६** | ३४६ ४९० ५८० **३** १६० ३४० २५० **७** २९९ ३८९ ४७९ **०** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट |
|---|---|
| १५७ ४४५ ३५५ **३** १५८ ३४७ ७८९ **४** ५०० ६९० ७८० **५** | १३५ ३६० ५६८ **९** २३५ ४६० ११८ **०** १५५ ५८८ ३९९ **१** |

| सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे | सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट |
|---|---|
| २२७ ६६९ ५७९ **१** २२८ ३३६ ४९९ **२** १३४ ३५० ५६७ **८** | ४६७ ८९० २५० **७** ७९० ११४ २४० **६** २४९ ४५६ ३४८ **५** |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

१ - २ - ३ - ९
०

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. ०२-०२-२०२६ ०४-०२-२०२६ ०५-०२-२०२६
प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

## नशिबाची परीक्षा

सोमवार ०२ फेब्रुवारी २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ८-५-३ मजबुत

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| 125 260 440 | 8-6 | 123 240 268 | 84-16-52-39-60 |

**कल्याणम**
उदय-अस्त | सिंगल १-२-९ मजबुत

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| 146 128 119 | 1-0 | 190 280 460 | 13-70-42-95-08 |

**मुंबैम ( मेन )**
उदय-अस्त | सिंगल ४-३-७ मजबुत

| उदय-अस्त | | | जोड |
|---|---|---|---|
| 149 248 446 | 4-8 | 170 189 116 | 41-68-39-57-82 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

# गद्दारांना जागा दाखवा; ही स्वाभिमानाची निवडणूक

## पृथ्वीराज चव्हाण;जखिणवाडीत काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ जाहीर सभा

**कराड/प्रतिनिधी : –**

सत्तेत असताना वारुंजी जिल्हा परिषद गटासह जखिणवाडी परिसरासाठी कोट्यवधींचा निधी देऊन अनेक विकासकामे मार्गी लावली. मात्र सत्ता गेल्यानंतर स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी काहींनी भाजपची वाट धरली. वारंवार दिलेल्या संधीचे मोल न ठेवणाऱ्या अशा गद्दारांना या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा, असे ठाम आवाहन राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले.

जखिणवाडी (ता. कराड) येथे वारुंजी जिल्हा परिषद गट, तसेच वारुंजी व कोयना वसाहत पंचायत समिती गणातील काँग्रेस व समविचारी उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, महाराष्ट्र काँग्रेस ओबीसी सेलचे अध्यक्ष भानुदास माळी, कराड दक्षिण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नामदेवराव पाटील, प्रा. शरद काटकर, नगरसेवक फारूक पटवेकर, वारुंजी जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सौ. सुनंदा नामदेव पाटील, पंचायत समितीचे उमेदवार रवींद्र बडेकर, तसेच कोयना वसाहत पंचायत समिती गणातील उमेदवार श्रीकांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करत पंचायतराज व्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवली. लोकसभा व विधानसभा कायदे निर्मिती करतात, तर ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्था थेट विकासकामे राबवतात. राजीव गांधींनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाच वर्षांच्या कालावधीत होणे बंधनकारक केले. मात्र भाजप सरकारने तब्बल आठ वर्षे निवडणुका न घेता सर्व अधिकार प्रशासक म्हणून नोकरशाहीच्या हाती दिले. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या तंबीनंतरच सरकारला निवडणुका घ्याव्या लागल्या, असा आरोप त्यांनी केला.

जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक ही ग्रामीण विकासाची खरी निवडणूक असून, याच प्रक्रियेतून नवे नेतृत्व घडते. सरपंच ते मुख्यमंत्री असा प्रवास स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी केला, याची आठवण करून देत काँग्रेसच्या वारुंजी जिल्हा परिषद गटासह दोन्ही पंचायत समिती गणातील उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भानुदास माळी म्हणाले, पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री असताना महिलांना ५० टक्के आरक्षण दिले. त्यामुळे आज सर्वच निवडणुकांमध्ये महिलांना मोठ्या प्रमाणात संधी मिळत आहे. सामान्य कुटुंबातून पुढे आलेले नामदेव पाटील यांचे नेतृत्व लोकसेवेसाठी समर्पित असून, त्यांच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याची जबाबदारी मतदारांची असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवराज मोरे यांनी, पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महिलांना राजकारणात सन्मानाचे स्थान मिळाले. वारुंजी जिल्हा परिषद गटात नामदेव पाटील यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून,



सर्व उमेदवार सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी पंचायत समिती सदस्य नामवेद पाटील म्हणाले, विधानसभेच्या निकालानंतर वारुंजी जिल्हा परिषद गटासह काही कार्यकर्त्यांनी भाजपची वाट धरली, मात्र या निर्णयाला आपण शेवटपर्यंत विरोध करत अनेकांना मी थांबवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. नरेंद्र पाटील यांनाही याबाबत स्पष्ट सल्ला दिला होता. वेळप्रसंगी उदयसिंह पाटील–उंडाळकर यांच्याशी चर्चा करावी, असेही सांगितले होते. मात्र आपण भाजपमध्ये जाणारच, अशी त्यांची भूमिका ठाम होती. भाजपमध्ये गेल्यावर लोकांची सेवा न करता सहज विजय मिळवता येतो, अशी एक मानसिकता समाजात तयार झाली आहे, ही लोकशाहीसाठी घातक बाब आहे. श्रीकांत पाटील यांची नाळ थेट जनतेशी जोडलेली आहे, ते कायम लोकांमध्ये राहून काम करणारे नेतृत्व आहे. त्यामुळे त्यांच्या सोबत असलेले सर्वच उमेदवार बहुमताने निवडून येतील, असा ठाम विश्वास व्यक्त करत या निवडणुकीत जनतेने व्यक्ती, पक्ष किंवा सत्ता न पाहता प्रत्यक्ष काम करणाऱ्या नेतृत्वाला साथ द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रा. शरद काटकर, नगरसेवक फारूक पटवेकर, तसेच सर्व उमेदवारांनीही मनोगत व्यक्त केले. सभेस वारुंजी जिल्हा परिषद गट व कोयना वसाहत पंचायत समिती गणातील मतदारांसह महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# केंद्रीय अर्थसंकल्पातून विकसित भारताच्या दिशेने ठोस पाऊल

**कराड/प्रतिनिधी : –**



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा देशाच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा ठरणारा असल्याचे मत आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी व्यक्त केले.

आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था या महत्त्वाच्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आल्याने 'विकसित भारत' या संकल्पनेला भक्कम आधार मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या अर्थसंकल्पात शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या तरतुदी भविष्यातील पिढीसाठी दिशादर्शक ठरणाऱ्या आहेत. विशेषतः प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृहे उभारण्याचा निर्णय हा स्त्री शिक्षणाला चालना देणारा असून, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे डॉ. भोसले यांनी नमूद केले.

देशातील रस्ते व महामार्ग विकासासाठी १५ हजार कोटी रुपयांची तरतूद करून दळणवळण व्यवस्था अधिक गतिमान करण्याचा दूरगामी विचार या अर्थसंकल्पातून दिसून येतो. यामुळे व्यापार, उद्योग आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शेती आणि ग्रामीण भागासाठी जाहीर केलेल्या विविध योजनांमुळे शेतकरी वर्गाला दिलासा मिळणार असून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल. 'लखपती दीदी' योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा सरकारचा संकल्प ग्रामीण भागातील स्वयंपूर्णतेसाठी निर्णायक ठरणार असल्याचे भोसले म्हणाले.

एकूणच हा अर्थसंकल्प सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि युवकांच्या अपेक्षांना न्याय देणारा असून देशाच्या प्रगतीला नवी दिशा देणारा आहे, असे मत आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी व्यक्त केले.

# कराड दक्षिणचा चेहरामोहरा बदलणार

## आ.डॉ.अतुलबाबा भोसले:येरवळे येथे प्रचार सभा

**कराड/प्रतिनिधी:–**

कराड दक्षिण मतदारसंघात रस्ते, पाणीपुरवठा आणि मूलभूत सुविधांमध्ये आमूलाग्र बदल घडविण्याचा भाजपाचा संकल्प आहे. भाजपाच्या माध्यमातून कराड दक्षिणचा चेहरामोहरा बदलण्याचे काम प्राधान्याने केले जाईल. पाणंद रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असून, येत्या काळात विकासाची ही गती अधिक वाढविणार असल्याची ग्वाही भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी दिली. येरवळे (ता. कराड) येथे भाजपा जाहीर पक्ष प्रवेश व कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर येरवळे येथील कृष्णा कारखान्याचे माजी संचालक विलासराव पाटील, माजी सरपंच सुभाष पाटील, युवा नेते रणजित पाटील, अमित पाटील, संभाजी यादव यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. आ.डॉ. अतुलबाबा भोसले यांनी त्यांचे स्वागत केले.

व्यासपीठावर भाजपच्या विंग जिल्हा परिषद गटातील उमेदवार शैलजा शिंदे, विंग पंचायत समिती गणाच्या उमेदवार नंदाताई जाधव, कोळे पंचायत समिती गणाचे उमेदवार अर्जुन कराळे, माजी आमदार आनंदराव पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य शंकरराव खबाले, य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक



सयाजी यादव, वसंतराव शिंदे, मलकापूरचे नगराध्यक्ष तेजस सोनावले, कराडचे नगरसेवक सुहास जगताप, सुदन मोहिते, आर. टी. स्वामी, सचिन पाचपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आ.डॉ. भोसले म्हणाले, की देश व राज्य पातळीवर भाजपाला जनतेचा सातत्याने वाढता पाठिंबा मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देशाला मजबूत सरकार मिळाले असून, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा अधिक भक्कम झाली आहे. विरोधी शक्तींना ठामपणे उत्तर देत भारत आज महासत्ता म्हणून ओळखला जात आहे.

कराड दक्षिण मतदारसंघात पाणंद रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असून, पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जात आहे. या विकासाला आणखी गती मिळवून देण्यासाठी मतदारांनी भाजपाच्या उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संजय यादव, हेमंत पाटील, निवासकाका पाटील, अरुण यादव, सुनील यादव, विकास माने, सुरेश शिंदे, प्रतापराव पवार, धनाजीराव पाटील, आनंदराव यादव यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रीय अर्थसंकल्प म्हणजे विकसित भारताच्या संकल्पाची पूर्तता करणारा 'लोककल्याणकारी' आराखडा

## आ. सुधीर गाडगीळ

**सांगली/प्रतिनिधी:–**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सादर केलेला सन २०२६–२७ चा अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक, दूरदृष्टी असलेला आणि भारताला जागतिक आर्थिक महासत्ता बनवणारा आहे, अशी प्रतिक्रिया सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ यांनी व्यक्त केली आहे.

आमदार गाडगीळ यांनी या अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकत खालील मते मांडली.

मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा: आयकर मर्यादेत केलेली वाढ आणि कररचनेत दिलेली सवलत यामुळे मध्यमवर्गीय नोकरदारांच्या हातात अधिक बचत राहील. सामान्य माणसाच्या खिशाचा विचार



करणारा हा अर्थसंकल्प आहे.

शेतकरी आणि ग्रामीण विकास: शेती क्षेत्रासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि सिंचन प्रकल्पांना दिलेले प्राधान्य हे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. सांगलीसारख्या शेतीप्रधान जिल्ह्याला याचा मोठा लाभ होईल.

पायाभूत सुविधांचा विकास: रेल्वे, महामार्ग आणि पायाभूत सुविधांसाठी केलेली विक्रमी तरतूद देशाच्या प्रगतीचा वेग वाढवणारी आहे. यामुळे व्यापार आणि उद्योगांना मोठी चालना मिळेल.

युवा आणि रोजगार: स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि युवकांसाठी कौशल्य विकास योजनांमुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. नवीन उद्योजकांसाठी हा अर्थसंकल्प 'सुवर्णसंधी' आहे.

महिला सक्षमीकरण: लखपती दीदी योजना आणि महिला बचत गटांसाठीच्या विशेष तरतुदींमुळे ग्रामीण भागातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो गरीब, शेतकरी, महिला आणि तरुणांच्या आशा–आकांक्षांना बळ देणारा आहे. 'सबका साथ, सबका विकास' या मंत्राला सार्थ ठरवत अर्थमंत्र्यांनी सर्व क्षेत्रांना न्याय दिला आहे. सांगलीच्या आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी देखील हा अर्थसंकल्प अत्यंत पूरक ठरेल असे मत आ. सुधीर गाडगीळ यांनी व्यक्त केले.

# येलूर जि.प.मतदार संघात भाजपची विजयी घोडदौड कायम राहणार

## खा.धैर्यशील माने:बहादूरवाडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात जाहीर सभा संपन्न

**ईश्वरपूर/प्रतिनिधी:–**

येलूर जिल्हा परिषद मतदार संघात आजवरची विकासकामे, राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांच्या बळावर भाजपा महायुतीचे उमेदवार विजयी होणार असून महाडिक गटाचा हा बालेकिल्ला अभेद्य राहील असा विश्वास खासदार धैर्यशील माने यांनी व्यक्त केला. या मतदारसंघातील प्रचार सभेच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री सदाभाऊ खोत, आ. सत्यजित देशमुख, सांगली जिल्हा बँकेचे संचालक राहुलदादा महाडिक, भारतीय जनता पार्टीचे सांगली जिल्हाध्यक्ष सम्राटबाबा महाडिक, माजी जि.प.सदस्या श्रीमती मीनाक्षीकाकी महाडिक यांची प्रमुख उपस्थिती होती.

येलूर जिल्हा परिषद मतदार संघाच्या उमेदवार सौ.हर्षदा महाडिक, पंचायत समितीचे उमेदवार सौ.विमल खोत व पुष्पराज महाडिक यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या या सभेला परिसरातील नागरिक, कार्यकर्ते युवक व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रचंड मोठ्या उत्साहात ही सभा पार पडली. यावेळी बोलताना माजी मंत्री सदाभाऊ खोत म्हणाले, स्व.नानासाहेबांचे या परिसरावर जीवापाड प्रेम होते व त्यांचे या परिसरावर असणारे उपकार मतदारसंघातील जनता



कधीही विसरणार नाही. आ.सत्यजित देशमुख म्हणाले, केंद्रात व राज्यात भाजपा व महायुतीचे सरकार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवारांना निवडून देणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा बँकेचे संचालक राहुलदादा महाडिक म्हणाले, सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानूनच वाटचाल करत असताना आजवर या मतदारसंघाच्या माध्यमातून महाडिक गटाला प्रतिनिधीत्व करण्याचे संधी मिळाली आहे. सम्राटबाबा महाडिक यांनी विरोधकांच्या टीकेचा समाचार घेत असतानाच त्यांनी पातळी सोडून राजकारण न करता विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवावी असे मत व्यक्त केले.

माजी जि.प.सदस्या श्रीमती मीनाक्षीकाकी महाडिक यांनी भारतीय जनता पार्टीच्या महत्वपूर्ण योजनांचा उल्लेख करत असताना महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार घेणार असल्याचे मत विशद केले. सौ.हर्षदा महाडिक यांनी मतदारसंघाच्या विकासाचे 'व्हिजन' मांडले व त्यांच्यासह पंचायत समितीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे आवाहन केले. उपसरपंच श्री संपतराव चव्हाण यांनी स्वागत केले.

माजी पंचायत समिती सदस्य मारुती खोत, यांनी प्रास्ताविक व्यक्त केले. रोहित बेनाडे यांनी त्यांच्या गटाचा भाजपला पाठींबा असल्याचे जाहीर केले. यावेळी वारणा बँक संचालक बाळासो बावडे, वैभव चव्हाण, माजी सरपंच राजेंद्र पाटील, विजयकुमार माने, महेश खोत, शिवाजी देसावळे, डॉ. धनंजय कुरणे, सुरेश खोत, तुकाराम खोत, भाऊसो पाटील, हेमंत पाटील, अनिल सागर चव्हाण, तानाजी घोरपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अभिजीत खोत यांनी आभार मानले.

# उंब्रज व पाडळी परिसरात दोन ठिकाणी भीषण आगी

## टँकरसह दोन ट्रक जळाले; लाखोंचे नुकसान

**कराड/प्रतिनिधी : –**

करड तालुक्यात रविवारी एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी भीषण आगीच्या घटना घडून टँकरसह दोन ट्रक जळाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. पुणे–बेंगलोर राष्ट्रीय महामार्गालगत उंब्रज परिसरात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दोन ट्रक्सना आग लागली, तर पाडळी गावानजीक मळीने भरलेला टँकर पलटी होऊन त्याच्या केबिनला आग लागली. या दोन्ही घटनांमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



पहिली घटना सकाळच्या सुमारास पुणे–बेंगलोर महामार्गावरील उंब्रजनजीक शिवडे गावच्या हद्दीत गणेश धाब्याजवळ घडली. येथे पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका ट्रकला अचानक आग लागली. काही क्षणातच आग इतकी भीषण झाली की, संपूर्ण ट्रक जळून खाक झाला. आगीची तीव्रता वाढल्याने नजीक उभ्या असलेल्या दुसऱ्या ट्रकनेही पेट घेतला. नागरिकांनी तत्काळ कराड अग्निशमन विभागाला माहिती दिली.

त्यानंतर तात्काळ अग्निशमन विभागाचे वाहनचालक संजय अडसूळ, लिडिंग फायरमन विनोद काटरे, फायरमन विठल ढगळे हे पथक अग्निशमन वाहनासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने पाण्याची फवारणी करून आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत पहिला ट्रक पूर्णपणे जळून खाक झाला होता, तर दुसऱ्या ट्रकचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

दरम्यान, दुपारी दीडच्या सुमारास कराड तालुक्यातील पाडळी गावानजीक आणखी एक घटना घडली. मळीने भरलेला टँकर (क्र. एमएच ५० एन ९४२१) शेतातून जात असताना खचलेल्या रस्त्यामुळे पलटी झाला. पलटी झाल्यानंतर टँकरच्या केबिनला आग लागली. याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि तात्काळ आग विझविण्यात यश मिळवले. या घटनेत टँकरचे नुकसान झाले असले तरी, मोठी दुर्घटना टळली.

या दोन्ही आगीच्या घटनांची नोंद रात्री उशिरापर्यंत संबंधित पोलिस ठाण्यात झालेली नव्हती. आगीची कारणे अद्याप स्पष्ट झालेली नसून, पुढील तपास सुरू आहे.

# मिरजेत सराईतकडून दोन किलो गांजा जप्त

**सांगली / प्रतिनिधी:–**

महात्मा गांधी चौक पोलिसांनी शहरात गांजा विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर छापा टाकून त्याच्याकडून २ किलो गांजा जप्त केला आहे. दि. २९ जानेवारी रोजी अकरा वाजण्याच्या सुमारास ही कारवाई केली. पोलिसांनी सदरच्या सराईत गुन्हेगाराकडून २ किलो गांजा व एक दुचाकी असा सुमारे १ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलीस अधीक्षक संदीप घुगे, अप्पर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रणील गिल्डा यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप गुरव, हेड कॉन्स्टेबल अभिजीत धनगर, सचिन कुंभार, पोलीस नाईक नानासाहेब चंदनशिवे, कॉन्स्टेबल बसवराज कुंदगोळ, विनोद चव्हाण, मोहसीन टीनमेकर, राजेंद्र हारगे, अमोल तोडकर, चालक पोलीस कॉन्स्टेबल निवास माने, चालक पोलीस नाईक



देवानंद नागरगोजे यांनी ही कारवाई केली. नवाज सलीम मकानदार (वय ३२, रा. प्रताप कॉलनी, रॉकेल डेपो झोपडपट्टी, मिरज) यास पोलिसांनी अटक केली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंदे यांना माहिती मिळाली होती की, कर्नाटक राज्यात गांजा विक्रीचे गुन्हे दाखल असणारा नवाज सलीम मकानदार हा गांजा विक्री करण्यासाठी मिरजेत येणार आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक शिंदे यांनी गुन्हे शाखेच्या पथकास सदर सराईत गुन्हेगाराविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले. पोलिसांनी त्याच्यावर छापा टाकून त्यास ताब्यात घेतले असता त्याच्याकडे ५० हजार रुपये किंमतीचा २ किलो गांजा व एक दुचाकी मिळून आले. त्यास न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

# बीडीओ पत्नीचा जाचहाट, सहायक सरकारी वकिलावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

गटविकास अधिकारी असलेल्या पत्नीचा जाचहाट केल्याप्रकरणी शाहूनगर, सातारा येथील सहायक सरकारी वकिलासह दोघांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. स्वप्नील संपतराव पवार व निर्मला संपतराव पवार (दोघे रा. ४६, नेस्ट कॉलनी, हिलटॉप कॉलनी, चारभिंतीजवळ, शाहूनगर, गोडोली, सातारा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांच नावे आहेत. अंजली स्वप्नील पवार (लग्नाआधीचे नाव अंजली रवींद्र बर्गे (वय ३३, रा. लेकव्ह्यू रेसिडेन्सी, गोडोली, सातारा) यांनी फिर्याद दिली.

लग्नात काढलेल्या फोटोचे पैसे तूच दे, असे म्हणत गाडीत वाद घालून अविश्वास दाखवत अपमान, शारीरिक छळ, दागिन्यांची सतत मागणी करून वाद घालत मला कायदा शिकवू नकोस, मी कोर्टात हे रोज करतो, तुला नांदायचे असेल तर नीट नांद नाहीतर माहेरी निघून जा असे पतीने म्हटल्याचे व सासूने हुंड्यासाठी छळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# राजकारणाच्या पलीकडे मैत्री जपणारा अजितदादा सारखा नेता हरपला

## साताऱ्यात सर्वपक्षीय शोकसभेत मान्यवरांची श्रद्धांजली

**सातारा/प्रतिनिधी:–**

महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मोठे योगदान आहे. पक्ष, विचार वेगळे असले तरी मैत्री जपणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करताना त्यांनी राजकीय भेदभाव न करता जिल्ह्यात विकासकामांचा डोंगर उभा केला. त्यांच्यासोबत वित्त राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना अनेक चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. अजितदादा हे उत्तम प्रशासक होते, त्यामुळे आता मंत्रीमंडळात काम करताना त्यांची उणीव कायम जाणवणार आहे. यापुढे सातारा जिल्ह्यात काम करताना अजितदादांच्या कामांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून काम करणार असल्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनानंतर रविवारी सातारा येथे त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय आयोजित केलेल्या जिल्हा परिषदेच्या सभागृहातील शोकसभेत ना. देसाई बोलत होते.

यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, खा. श्री. छ. उदयनराजे भोसले, खासदार नितीनकाका पाटील, आमदार शशिकांत शिंदे, आमदार मनोजदादा घोरपडे, आमदार महेश शिंदे, आमदार सचिन पाटील, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, माजी आमदार आनंदराव पाटील, माजी आमदार दिपक चव्हाण, माजी आमदार सदाशिव सपकाळ, शिवसेना उबाठा गटाचे नितीन बानुगडे – पाटील, आरपीआयचे अशोक गायकवाड, बाळासाहेब सोळस्कर, धैर्यशील कदम, सुनील माने, शिवसेना (शिंदे गट) संपर्क प्रमुख शरद कणसे, रणजीतसिंह भोसले, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा भाग्यश्री भाग्यवंत यांच्यासह सातारा जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी ना. देसाई पुढे म्हणाले, राज्याचा वित्तमंत्री कसा असावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे अजितदादा पवार. अजितदादा यांनी मंत्रीमंडळात काम करताना अनेक बारकावे जवळून पाहता आले. प्रशासनावर त्यांची चांगली पकड होती. सर्व खात्यांतील कामांचा अनुभव असणारे नेते म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या अकाली निधनाने राज्याचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कामांचा आदर्श घेऊन सर्वांनी काम करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी ना. श्री. छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, स्वर्गीय श्री. छ. अभयसिंहराजे भोसले यांच्या निधनानंतर ना. अजितदादा पवार यांनी मला खऱ्या अर्थाने ताकद दिली. त्यांच्या बहुमोल पाठबळामुळेच मला सातारा परिसरात मोठी विकासकामे करता आली. अजितदादांनी समाजहिताच्या कामांना नेहमीच प्राधान्य दिले. अगदी भाजपमधील पक्ष प्रवेशानंतरही अजितदादांनी पक्षीय भेदभाव न करता साताऱ्याच्या विकासाला झुकते माप दिले. येथील शासकीय विश्रामगृह, मेडीकल कॉलेद, कास धरण उंची प्रश्न तसेच साताऱ्याच्या हद्दवाओढीचा प्रश्न असा एक ना अनेक कामे अजितदादा यांनी सातारा जिल्ह्यात मार्गी लावली. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रासोबत सातारा जिह्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या कामांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आता अशी विकासकामे होणे गरजेचे आहे.

यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, अजितदादा पवार यांचा वक्तशीरपणा गुण हा वाखाणण्याजोगाच होता. त्यांच्यासारखा मी ही वक्तशीर राहिलो असतो तर आज काळाबरोबरच दोन पावले पुढे राहिलो असतो. आमचे पक्ष जरी वेगळे असले तरी अजितदादा पवार यांनी शाहू, फुले, आंबेडकर तसेच यशवंत विचारात कधीही तडजोड केली नाही. अजितदादा यांच्या रुपाने देशातील एक युवा नेता तसेच राज्याच्या नेतृत्त्वाची अपेक्षा असलेले नेतृत्त्व गमावले आहे. मुख्यमंत्री पदाच्या काळात आम्ही समाजहिताचे अनेक निर्णय घेतले. मुख्यमंत्री काळात काही कायदे करताना मला त्यांची मोलाची मदत झाली. काही कारणाने आमच्यात मतभेद, गैरसमज झाले त्यानंतर आमच्यात दुरावा वाढला. प्रसंगी मी माघार घेतली असती तर आज महाराष्ट्रात वेगळेच चित्र दिसले असते. ते असते तर भविष्यात राज्यात नक्कीच सत्ताबदल झाला असता, असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.



सातारा :उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस अभिवादप्रसंगी ना. शंभूराज देसाई,ना.श्री.छ.शिवंद्रसिंहराजे भोसले, खा.श्री.छ.उदयनराजे भोसले, खासदार नितीनकाका पाटील, आमदार शशिकांत शिंदे व इतर.

यावेळी आमदार शशिकांत शिंदे, आमदार मनोजदादा घोरपडे, आमदार महेश शिंदे, आमदार सचिन पाटील, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, माजी आमदार आनंदराव पाटील, माजी आमदार दिपक चव्हाण, माजी आमदार सदाशिव सपकाळ, शिवसेना उबाठा गटाचे नितीन बानुगडे – पाटील, आरपीआयचे अशोक गायकवाड, बाळासाहेब सोळस्कर, धैर्यशील कदम, सुनील माने यांच्यासह विविध मान्यवरांनी यावेळी भावना व्यक्त केल्या .

प्रारंभी खा. नितीनकाका पाटील यांनी शोकसभेचा ठराव मांडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दोन मिनीट स्तबध्द उभे राहून स्ववर्गीय अजितदादा पवार यांना श्रध्दांजली वाहिली. शवेटी पसायदानाने या शोकसभेची सांगता झाली.